रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक १२६ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


## काका-पुतणे पुन्हा एकत्र

**पुणे :** पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथे झालेल्या बैठकीत ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकदा एकत्र आले. उपमुख्यमंत्री म्हणून तुमची जबाबदारी आहे या शेतकऱ्यांना जाऊन भेटणं आणि त्यांच्याकडे योग्य ती मदत पोहोचवणं, अशा शब्दात शरद पवारांनी अजित पवारांना पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या. या बैठकीत राज्यातील साखर कारखान्यांचे पदाधिकारी उपस्थित होते आणि आगामी हंगामाविषयी चर्चा झाली. प्रामुख्याने, मराठवाड्यातील पूरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचा मुद्दा चर्चेत होता. अनेक शेतकऱ्यांपर्यंत अद्याप मदत पोहोचली नसल्याने शरद पवारांनी अजित पवारांना वैयक्तिक लक्ष घालण्यास सांगितले.

## हनी ट्रॅपप्रकरणी संशयित अटकेत

चंदगड : आमदार शिवाजी पाटील यांना मोबाईलद्वारे अश्लील मेसेज आणि फोटो पाठवून पैशांची मागणीप्रकरणी मांडेदुर्ग येथील तरुणाला चितळसर पोलिसांनी ताब्यात घेतले. संशयित मोहनने दुसऱ्या व्यक्तीकडून आमदार पाटील यांचा मोबाईल नंबर मिळवून वर्षभरापासून त्यांना अश्लील मेसेज व फोटो पाठवत होता. संवाद वाढल्यानंतर तो विविध तरुणींचे अश्लील फोटो पाठवू लागला. त्यानंतर याच चॅटिंगचा आधार घेऊन राजकीय प्रतिमा मलीन करतो, अशी धमकी देत पैशाची मागणी करू लागला. पैसे न दिल्यास तुमची पोलिसात तक्रार करणार अशी धमकीही दिली. पाटील यांनी त्याचा नंबर ब्लॉक केल्यानंतरही त्याने दुसऱ्या क्रमांकावरून त्रास देणे सुरूच ठेवले.

### हवामानामुळे मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले

# मासेमारीला फटका

**। रायगड । प्रतिनिधी ।**

१ जून ते ३१ जुलै अशी ६१ दिवसांची पावसाळी मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून नव्या मासेमारी हंगामाला सुरुवात झाली. नव्या मासेमारी हंगामाला अतिवृष्टी तसेच वादळी वारे यांचा जबरदस्त फटका बसला आहे.

हंगामाच्या सुरुवातीला पारंपरिक, रापणकार तसेच ट्रॉलिंग पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना अनपेक्षित नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागल्याने ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असतानाही खराब हवामानामुळे या दोन महिन्यात मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आलेली नाही. लहरी हवामान, सततचा पाऊस आणि



वादळी वारे यामुळे मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

नव्या हंगामात चांगल्या प्रकारे मासेमारी करता येईल, अशी अपेक्षा असतानाच नारळी पौर्णिमेनंतर अचानक वादळी हवामान आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. त्यामुळे मासेमारीत काही दिवसांचा खोळा आला. त्यानंतर पुन्हा मासेमारी सुरु झाली. गौरी-गणपतीच्या काळात वातावरणात झालेल्या अचानक बदलामुळे खराब हवामानामुळे मासेमारीला मोठा फटका बसला. वादळी हवामानामुळे नौका किनाऱ्यावर नांगरून ठेवण्याची वेळ आली. वादळी वाऱ्यामुळे इतर जिल्ह्यातील नौकांना अन्य बंदरांचा आसरा घ्यावा लागला होता.

जिल्ह्यातील काही नौकांना इतर बंदरात नांगर टाकावा लागला होता.त्याचबरोबर नवरात्रोत्सव सुरु होताच पुन्हा बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने शक्ती नावाचे वादळ निर्माण झाले होते. त्यामुळे अतिवृष्टी आणि वादळी हवामानामुळे हवामान खात्याकडून किनारपट्टीवर रेड अलर्ट जाहीर करण्यात आला होता. त्यामुळे मच्छिमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला होता. त्यामुळे पुन्हा एकदा मासेमारी नौका किनाऱ्यावर ठेवण्याची वेळ आली.

मासेमारी मोसमामध्ये आतापर्यंत सातत्याने निसर्गाच्या अवकृपेमुळे मासेमारी ठप्प झाली. त्यामुळे यावर्षी मत्स्योत्पादनातही घट होण्याची शक्यता आहे.

पान २ वर

**मत्स्य दुष्काळाच्या संकटाना मच्छिमारांना सामोरे जाण्याची वेळ येणार आहे. मासे मिळण्याचे प्रमाण कमी झाल्याने माशांच्या किमतीतही वाढ होणार असल्याने खवय्यांच्या ताटातून मासळी गायब होण्याची शक्यता अधिक आहे.बदलत्या हवामानामुळे मासे मिळण्याचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे हजारों रुपयांचे इंधन खर्च करूनही नौका समुद्रात गेल्यावर मासळी जाळ्यात मिळत नाही. योग्य प्रमाणात मासे मिळत नसल्याने इंधनासह खलाशांचा खर्चही भागत नाही. आता मच्छिमारांसमोर आर्थिक संकट उभे राहणार आहे.**

# आज आरक्षण सोडत

### जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या सदस्यपदांच्या आरक्षणाकडे लक्ष



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्य पदांचे आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाची हालचाल सुरू झाली असून सोमवारी (दि.१३)अलिबागसह जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यात आरक्षणाची सोडत जाहीर केली जाणार आहे. जिल्हा परिषदेचे आरक्षण दुपारी बारा वाजता अलिबागमध्ये, तर पंचायत समितीचे आरक्षण सकाळी अकरा वाजता प्रत्येक तालुक्यात होणार आहे. कोणत्या गणात आणि गटात काय आरक्षण पडणार हे चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या आरक्षणाकडे वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

रायगड जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या अध्यक्षपदाचे आरक्षण नुकतेच जाहीर करण्यात आले. सदस्य पदाचे आरक्षण कधी जाहीर होणार याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले होते. अनेकांनी आपआपल्या मतदार संघात मोर्चेबांधणी अगोदरपासूनच सुरू केली आहे. काहींनी जाहीरात बाजी करून आपणच या मतदार संघाचे उमेदवार असा दिखावादेखील केला आहे. त्यामुळे सदस्यपदाच्या आरक्षणानंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागास वर्ग आणि स्त्रियांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने प्रक्रिया राबविली जाणार आहे. महाराष्ट्र

पान २ वर

## वेधक

### तळ्यात चौघांना श्वान दंश

**तळा :** तळा शहरात सध्या पिसाळलेल्या कुत्रीची दहशत निर्माण झाली असून या पिसाळलेल्या कुत्रीने चार जणांचा चावा घेतला आहे. तळा बसस्थानकाच्या मागील बाजूस पिसाळलेल्या कुत्रीने गेल्या तीन दिवसात चार जणाना चावा घेतला आहे. यामध्ये दोन पुरुष व दोन महिलांचा समावेश आहे. ही कुत्री कुठेतरी प्रसुती झाल्याने ती अधिक चवताळली असून तिने या चार जणांचा चावा घेऊन चांगलेच रक्तबंबाळ केले आहे. शहरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून नसबंदी करणे बाबत कोणतीही ठोस भूमिका प्रशासनाने घेतलेली नाही.शालेय विद्यार्थी, लहान मुलांना, वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग बांधवांना लगेचच पळ काढता येत नाही.

### जेएनपीएच्या अध्यक्षपदी गौरव दयाल

**उरण :** भारत सरकारच्या मंत्रिमंडळ नियुक्ती समितीने एक महत्त्वाचा निर्णय घेत, आयएएस गौरव दयाल यांची जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे नवे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती संयुक्त सचिव स्तरावर करण्यात आली आहे. गौरव दयाल यांची पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा पुढील आदेश येईपर्यंत जबाबदारी देण्यात आली आहे. ते संजय सेठी यांची जागा घेणार आहेत, ज्यांनी गेल्या काही वर्षांत जेएनपीटीला नवीन गती दिली होती. गौरव दयाल यांच्या नेतृत्वाखाली जेएनपीटीचे नवे विकास प्रकल्प व आंतरराष्ट्रीय गुंतवणुकींना नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा आहे.

### हल्ल्यात पाकचे ५८ सैनिक ठार


**काबुल:** अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष वाढला आहे. पाकिस्तानने हवाई हद्दीचा भंग करत काबुलसह अफगाणिस्तानातील दोन ठिकाणी हल्ला केल्याचा दावा तालिबान सरकारने केला होता. त्यानंतर शनिवारी रात्री दोन्ही देशातील संघर्ष पेटला. अफगाणिस्तानने पाकिस्तानी लष्कराच्या चौक्यांना निशाणा बनवले, यात ५८ पाकिस्तानी सैनिक मारले गेले. तालिबान सरकारच्या प्रवक्त्याने हा दावा केला आहे. सीमेवरील पाकिस्तानच्या २० चौक्या तालिबानने ताब्यात घेतल्या होत्या. त्या परत देण्यात आल्या आहेत. अफगाणिस्तानातील तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी पत्रकार परिषद घेऊन याबद्दलची माहिती दिली.

# नवी पीक विमा योजना कुचकामी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांवर अतिवृष्टी, वादळ आणि पुराचा तडाखा बसला असतानाच, प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या नव्या अटी शेतकऱ्यांसाठी धक्कादायक ठरत आहेत. राज्य शासनाने २४ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, या वर्षीपासून वादळ, अतिवृष्टी, पूर आणि गारपीट यांसारख्या वैयक्तिक आपत्तींसाठी कोणतीही भरपाई मिळणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे.

पूर्वी शेतकऱ्यांच्या शेतात पूर आला, पीक वाहून गेले किंवा गारपिटीमुळे नुकसान झाले तरी विमा कंपनीकडून भरपाई मिळत असे. मात्र, आता या सर्व बाबी योजनेतून वगळण्यात आल्या आहेत.योजनेनुसार, जर नुकसान फक्त एका शेतकऱ्याच्या शेतात झाले असेल, तर तो वैयक्तिक



आपत्ती मानला जाईल आणि त्याला विमा भरपाई मिळणार नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना नुकसान होऊनही विमा मिळण्याची शक्यता नाही.नव्या नियमांनुसार, भरपाई फक्त उत्पादन घट झाल्यास दिली जाणार आहे. तीही हंगाम संपल्यानंतर. पूर्वी पेरणीपासून काढणीपर्यंत संरक्षण असलेली योजना आता फक्त काढणीनंतरच्या उत्पादनावर अवलंबून राहणार आहे.

पूर्वी शेतकरी थेट टोल-फ्री क्रमांकावर आपली तक्रार नोंदवू शकत होते. मात्र, आता ती सुविधा बंद करण्यात आली आहे. उलट, तक्रार केल्यास वैयक्तिक आपत्तींसाठी तरतूद नाहीफ्र असा संदेश शेतकऱ्यांना मिळतो. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा कोणताही मार्ग उरलेला नाही.

या नव्या नियमांमुळे विमा कंपन्यांच्या तिजोऱ्या मात्र भरतील. शेतकरी विमा प्रीमियम भरत असले तरी त्यांना प्रत्यक्षात संरक्षण मिळणार नाही.पीक विमा योजना शेतकऱ्यांसाठी कुचकामी, आणि कंपन्यांसाठी फायद्याची ठरत आहे, असा सूर शेतकरी संघटनांकडून उमटत आहे. शेतकरी संघटनांनी शासनाकडे मागणी केली आहे की, अतिवृष्टी, पूर, गारपीट यांसारख्या आपत्ती पुन्हा योजनेत समाविष्ट कराव्यात.तक्रार नोंदणीची सुविधा पुन्हा सुरू करावी. भरपाईची प्रक्रिया पारदर्शक ठेवावी. पूर्वी नुकसान झाल्यास कंपनीच्या नंबरवर फोन करून तक्रार करता येत होती. आता टोल-फ्री नंबरवर फोन केला तरी उत्तर मिळत नाही. नवी योजना शेतकऱ्यांसाठी नव्हे तर विमा कंपन्यांच्या फायद्यासाठीच आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात चिमुकलीचा मृत्यू

**। शिरूर । प्रतिनिधी ।**

पिंपरखेड (ता.शिरूर) येथे भर दिवसा बिबट्याच्या हल्ल्यात शिवन्या शैलेश बोंबे या साडे पाच वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.१२) सकाळी पावणे दहा वाजता घडली.या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून बिबट्याच्या या हल्ल्याच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वनविभागाने त्वरित पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे

पिंपरखेड येथील शेतकरी अरूण देवराम बोंबे यांच्या घरा मागील शेतातजमीन नांगराणीचे काम सुरू होते. यावेळी त्यांची नात शिवन्या शैलेश बोंबे ही आजोबा अरूण बोंबे यांना पिण्यासाठी पाणी घेऊन येत असताना शेजारच्या



ऊसात दबा धरून बसलेल्या बिबट्याने शिवन्यावर झडप टाकून ऊसात फरपटत नेले. आजोबा अरूण देवराम यांनी हे भयावह दृश्य पाहिले असता त्यांनी धाव घेत ऊसात शिरलेल्या बिबट्याशी दोन हात करून बिबट्याच्या तावडीतून शिवन्याला सोडवले. तिला उपचारासाठी मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु त्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

या घटनेची माहिती मिळताच माजी सहकारमंत्री दिलीपराव

- **परिसरात पसरले भीतीचे वातावरण**
- **बिबट्याच्या बंदोबस्ताची केली मागणी**

वळसे पाटील व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेऊन घटनेची माहिती घेतली.या घटनेने पिंपरखेड परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. पिंपरखेड, जांबूत आणि चांडोह या दहा ते पंधरा किलोमीटर परिसरात बिबट्याचा हल्ल्यात मृत्यू झाल्याची ही सातवी घटना असून बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

### राज-उद्धव यांची मातोश्रीवर भेट

# युतीची चर्चा फायनल?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे हे सहकुटुंब मातोश्रीवर पोहोचले. स्नेहभोजनासाठी ही भेट झाल्याचं सांगण्यात येत असलं तरी राज आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये तब्बल पावणे तीन तास चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटामध्ये युतीवर अंतिम चर्चा झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांच्यामध्ये सातत्याने भेटीगाठी होत आहेत. मराठीच्या मुद्द्यावरून हे दोन बंधू



एकत्र आले. त्यानंतर आजची ही त्यांची सहावी भेट आहे.राज ठाकरे हे सहकुटुंब उद्धव ठाकरेंचे निवासस्थान मातोश्रीवर पोहोचले. त्यावेळी त्यांची आणि उद्धव ठाकरे यांच्या मध्ये पावणे तीन तास चर्चा झाल्याची माहिती आहे. आता ही चर्चा नेमक्या कोणत्या मुद्द्यावर झाली, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर या भेटीमध्ये काही चर्चा झाली का याची मात्र स्पष्टता नाही.राज ठाकरेंच्या मनसेकडून दिवाळीत शिवाजी

पान २ वर

# तरुणावर प्राणघातक हल्ला

### एमजीएम रुग्णालयात तरुणाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तुर्भे सेक्टर २१ परिसरात जुन्या वैरातून काही जणांनी एकत्र येऊन केलेल्या प्राणघातक हल्ल्यात एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

जुने वाद मिटविण्याच्या बहाण्याने त्या तरुणाला बोलावून हा हल्ला करण्यात आला. मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव किशोर वरक असे असून, तो आपल्या दोन मित्रांसह गंभीर जखमी झाला होता. शनिवारी (११ ऑक्टोबर) वाशीतील एमजीएम रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर रुग्णालयाबाहेर नातेवाईक आणि मित्रपरिवाराची मोठी गर्दी झाली होती. या घटनेमुळे तुर्भे परिसरात तणाव निर्माण झाल्याने नवी मुंबई पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आशुतोष मोहन धुर्वे हे नोकरी करणारे आहेत. ८ ऑक्टोबरच्या मध्यरात्री, साडेबारा वाजण्याच्या सुमारास आरोपींनी आशुतोष आणि त्याचे मित्र किशोर वरक व विकी कांबळे यांना जुने वाद मिटविण्यासाठी बोलावले. मात्र, तो एक सापळा ठरला.तेथे पोहोचताच आरोपींनी अचानक तिघांवर जीवघेणा हल्ला चढवला. क्रिकेटची लाकडी बॅट, फायबर रॉड, दगड आणि सिमेंटच्या विटांनी त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात किशोर वरकच्या डोक्यात गंभीर जखम झाली आणि आशुतोष धुर्वेचा हात मोडला, तर विकी कांबळेच्या बरगड्या आणि हातांवर गंभीर दुखापत झाली.

ही घटना लक्षात येताच परिसरातील रहिवाशांकडून जखमींना तत्काळ वाशीतील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू केले, मात्र किशोर वरकचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या घटनेनंतर मृताच्या नातेवाईक आणि मित्रपरिवाराचा रुग्णालयाबाहेर मोठ्या प्रमाणावर जमाव जमला. त्यामुळे संभाव्य तणाव लक्षात घेता पोलिसांनी तातडीने बंदोबस्त वाढवला आहे. या प्रकरणी एपीएमसी पोलिसांनी फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, विकी पाटील, संकेत लाड उर्फ लाडू, ओंकार वाघमारे उर्फ गण्या, विघ्नेश घरत, शकील, मौला, चारुशिला आणि तीन अज्ञात इसम अशा एकूण अकरा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

घटनेनंतर तुर्भे आणि एपीएमसी परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलिसांनी हल्ल्यात वापरलेली साधने आणि आरोपींचा नेमका हेतू काय होता, याचा तपास सुरू केला आहे. प्राथमिक चौकशीत जुन्या वैरातून हा हल्ला झाल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, आरोपींच्या अटकेसाठी दोन स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली आहेत.

### विषारी कफ सीरप प्रकरण

# ३० कंपन्यांची तपासणी सुरु

**। छिंदवाडा । वृत्तसंस्था ।**

मध्य प्रदेशातल्या छिंदवाडा, बैतूल आणि पांढुर्णा येथील विषारी कफ सीरप प्रकरणात २२ चिमुकल्यांचा मृत्यू झाल्यानंतर सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. मध्य प्रदेशचे ड्रग कंट्रोलर दिनेश श्रीवास्तव यांनी बॅन कफ सीरप स्टॉकची सीझ करण्याची कारवाई सुरु असल्याचं सांगितले.

श्रीवास्तव म्हणाले की, राज्यात कफ सीरपचं उत्पादन करणाऱ्या ३० कंपन्यांच्या तपासणीसाठी केंद्र सरकाराला पत्र पाठवण्यात आल आहे. एसआयटीकडून या प्रकरणाची कसून चौकशी सुरु आहे. दोषी आणि बेजबाबदार

पान २ वर

### विद्यार्थ्यांची प्रथम सत्र परीक्षा सुरू | २ मे ते १३ जूनपर्यंत उन्हाळी सुट्ट्या

# शाळांना १६ ते २७ ऑक्टोबरपर्यंत दिवाळी सुट्टी!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

दिवाळीपूर्वीच्या सत्र परीक्षा सुरू आहेत. काही शाळांच्या परीक्षा सुरूही झाल्या आहेत. १५ ऑक्टोबरपर्यंत विद्यार्थ्यांची परीक्षा पार पडतील. त्यानंतर शासनाने जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांना दिवाळी सुट्ट्या लागतील. १६ ते २७ ऑक्टोबरपर्यंत दिवाळी सुट्टी असणार आहे.

शैक्षणिक वर्षात ५२ रविवारी शाळांना सुट्टी असते. याशिवाय शाळांना सण-उत्सव, महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने अशा ७६ सार्वजनिक सुट्ट्यादेखील असतात. शैक्षणिक वर्षातील राहिलेल्या २३७ दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना अध्यापन होते. दरम्यान, यंदा जिल्हा परिषदेसह महापालिका, खासगी अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना १२ दिवस दिवाळी सुट्टी असणार आहे.

शैक्षणिक वर्षाच्या शेवटी २ मे ते १३ जूनपर्यंत शाळांना उन्हाळा सुट्ट्या असतील. तत्पूर्वी, एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून द्वितीय सत्र परीक्षा सुरू होतील.दरवर्षी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा उरकल्या जायच्या आणि विद्यार्थ्यांना एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापासूनच सुट्ट्या लागायच्या. म्हणजेच परीक्षा संपल्याने विद्यार्थी शाळेत येत नसत.




### दिवाळीनंतर शिक्षकांना इलेक्शन ड्यूटी

दिवाळीनंतर नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यभरातील जिल्हा परिषदांसह पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका दोन टप्प्यात होणार आहेत. त्यासाठी मनुष्यबळ खूप लागणार आहे. त्यामुळे दोन्ही टप्प्यात शिक्षकांना निवडणुकीची कामे करावी लागणार आहेत.

### २८ ऑक्टोबरपासून सुरू होतील शाळा

दिवाळीपूर्वीची प्रथम सत्र परीक्षा आजपासून (ता. १०) सुरू होईल. १५ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा संपतील. त्यानंतर १६ ऑक्टोबरपासून शाळांना तथा विद्यार्थ्यांना दिवाळी सुट्ट्या लागतील. २८ ऑक्टोबरपासून पुन्हा शाळा सुरू होतील.

त्यामुळे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने त्यात बदल करून सर्व शाळांची द्वितीय सत्र परीक्षा एकाचवेळी सुरू होईल, असे आदेश काढले. जेणेकरून शैक्षणिक वर्षातील किमान २२० दिवस तरी विद्यार्थ्यांचे अध्यापन व्हावे हा त्यामागील हेतू आहे.

# महामार्गावरील धुळीवर पाणी फवारणीचा उतारा



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील आंबेवाडी (कोलाड) बाजारपेठेतील रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. ही धूळ आजूबाजूला पसरत असुन यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ लागले आहेत. धुळीला पर्याय म्हणून रस्त्याला पाण्याची फवारणी केली जात आहे.

- **चौपदरीकरणाच्या कामावर नागरिक संतप्त**
- **हजारो लिटर पाणी जातेय वाया**

यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात आहे. पाणी वाया घालविण्यापेक्षा महामार्गाचे काम पूर्ण करा अशी मागणी संतप्त नागरिकांकडून करण्यात येत आहे.

महामार्गाचे काम गेली अठरा वर्षांपासून सुरु आहे. या महामार्गांवरील आंबेवाडी बाजारपेठेतील पूल, रस्ता, गटारांची कामे अपूर्णावस्थेत असुन याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. पावसाळा ऋतू संपला असुनही चौपदरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली नाही. यामुळे पावसाळ्यात खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात

पान २ वर

# खारघरचे पाणी तळोजाला

## • सिडकोच्या नियोजनात त्रुटी, रहिवासी हैराण

। पनवेल । प्रतिनिधी ।

**खारघर वसाहतीतील ४० सेक्टरना दररोज ७५ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे; पण शहराला ७२ एमएमएलडीच पाणीपुरवठा होत असून तळोजा वसाहतीला खारघरचे पाणी दिले जात असल्याने रहिवाशांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.स्वतःच्या मालकीचे धरण असूनही सिडको अखत्यारीत शहरांना पाणीपुरवठा करताना अडचणी येत आहेत. पनवेल महापालिकेत येणाऱ्या खारघरला पाणीपुरवठा करण्याचे काम सिडकोतर्फे केले जाते.**



सिडकोच्या हेटवणे, एमजेपी आणि नवी मुंबई पालिकेच्या मोरबे धरणातून शहराची तहान भागते. सध्यस्थितीत शहराला ७५ एमएलडी पाण्याची गरज आहे; पण खारघरला सध्या ७२ एमएलडी पाण्याचा पुरवठा होत आहे; पण आठवड्यातून किमान तीन ते चार दिवस शहराला पाणीपुरवठा होत नसल्याची ओरड आहे. व्हॅलिशिल्प, स्वप्नपूर्ती अशा मोठ्या गृहसंकुलांना फटका बसत आहे. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी सिडको तसेच रायगड भवन येथे हंडा मोर्चा काढत महिलावर्गाने अधिकाऱ्यांना फैलावर घेतले होते. त्यानंतर काही दिवस पाणीपुरवठा सुरळीत झाला होता; पण पुन्हा तीच परिस्थिती उद्भवत असल्याने रहिवाशांमध्ये संतापाची लाट आहे. याबाबत सिडकोचे पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक प्रकाश सेवतकर यांच्याशी संपर्क केला असता होऊ शकला नाही.

खारघर शहराची व्याप्ती वाढत आहे. ओवा आणि पेठ गावांपासून ३० ते ३६ सेक्टरपर्यंत शहर विस्तारलेले आहे. या भागात १२ पासून ४२ आणि ५२ मजल्यांपर्यंत उंचीच्या नवीन इमारती आहेत. खारघर सेक्टर ३७, ४० आणि ४२ मध्ये इमारतींची कामे सुरू आहेत. या इमारतीही १४ मजल्यांपेक्षा अधिक उंचीच्या आहेत; परंतु नव्या जलवाहिन्या आणि अतिरीक्त पाणीपुरवठ्याची कोणतीही योजना सिडकोने तयार केलेली नाही.

खारघरनंतर तळोजा नोडमध्ये सुमारे २५ हजार घरे तयार केली आहेत. अलीकडच्या काळात १५ हजार विक्रीकरिता उपलब्ध केली होती; मात्र तळोज्यामध्ये तयार केलेल्या गृहप्रकल्पांना पाणीपुरवठा होत नसल्याने अनेक ग्राहकांनी सिडकोच्या तळोजामधील घरांकडे पाठ फिरवली आहे.

या भागातील रहिवासी सोसायट्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठ्याची नामुष्की सिडकोवर आली आहे. दुसरीकडे व्हॅलिशिल्प, स्वप्नपूर्ती सोसायट्यांमध्ये आठवड्यातून चार दिवस पाण्याची बोंब असल्याने अनेकांवर घरांच्या विक्रीची वेळ आली आहे.

### टँकरचे भाव वधारले

खारघर, तळोजा नोडमध्ये आठवड्यातून किमान चार दिवस पाणीपुरवठा होत नाही. शहरातील जलकुंभ पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी दर आठवड्याच्या सोमवारी शटडाऊन घेतला जातो. सोमवारी कमी दाबाने पाणीपुरवठा होता. त्यानंतर खारघरला सात दिवस पाणी देता येते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले; परंतु आठवड्यातून चार दिवस पाणी येत नसल्याने रहिवाशांवर टँकर मागवावा लागत आहे; पण ४५ हजार लिटरच्या एका टँकरसाठी २५ ते ३० हजार रुपये मोजावे लागत असल्याने टँकरविक्रेत्यांकडून वाढीव दराने पाणी विकले जात आहे.

# एमडीप्रकरणी दोघांना अटक

**ठाणे** : दीड कोटींहून अधिक किमतीच्या एमडी प्रकरणात ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आणखी दोघांना अटक केली आहे. तसेच यापूर्वी अटक केलेल्या पालघरच्या कुडूस येथील मोहनलाल जोशी ऊर्फ शर्मा याच्या मुलीसह त्यांना एमडी पावडर पुरवणाऱ्याचा समावेश आहे. ते दोघे सध्या न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन गायकवाड यांनी दिली. कुडूस येथून मुंब्र्यात एमडी पावडर विक्रीसाठी आलेल्या मोहनलाल जोशी ऊर्फ शर्मा याला मुंब्रा बायपास उड्डाणपूल येथे १८ जुलैला ताब्यात घेतले. तसेच त्यांच्या कारच्या झाडाझडतीत एक किलो २०९ ग्रॅमचा एमडी मिळून आला. त्याची किंमत सुमारे एक कोटी ६९ लाख २६ हजार रुपये असून मोहनलाल हा मेडिकलचा मालक असल्याची माहिती पुढे आली.

### तिकिटासाठी पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठी

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मोर्चेबांधणी

। रायगड । प्रतिनिधी ।


रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी महायुती, महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली. गावातील नाक्यावर, चौकात निवडणुकांच्या चर्चा रंगू लागल्या असून उमेदवारीसाठी पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठींना जोर आला आहे. राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना शिंदे गटातील नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप करण्यास सुरुवात झाली आहे. यापूर्वीच्या निवडणुकीतील उणीधुणी काढली जात असताना भाजपचे पदाधिकारी शांत बसून निवडणुका जाहीर होण्याची वाट पाहत आहेत.

महायुती विरोधात महाविकास आघाडीत मुख्य लढत होणार असल्याने शेकापचे जयंत पाटील, काँग्रेसचे महेंद्र घरत, ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्यावर संपूर्ण मदार आहे; पण दुसरीकडे महाविकास आघाडीतील अनेक नेते महायुतीमध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे महायुतीची बाजू मजबूत असली तरी तिकीटवाटपावरून अंतर्गत बंडाळीला सामोरे जावे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.निवडणुका जानेवारीत होणार असल्याने सर्व पक्षांच्या नेत्यांनी विविध सामाजिक उपक्रम, विकासकामे, शासकीय योजना, पारंपरिक सण, पक्षप्रवेश, सामाजिक माध्यमे, वैयक्तिक जनसंपर्कातून भेटीगाठी सुरू केल्या आहेत. तर पक्ष नेतृत्वाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदारसंघातील कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या उमेदवारांपैकी कोणाला संधी मिळेल, याची उत्सुकता आहे.

# दिवाळीत आकाशकंदील उडविण्यावर बंदी

। रायगड । प्रतिनिधी ।

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आकाशकंदील हवेत सोडणे, विक्री करणे आणि साठा ठेवणे यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. हा आदेश १७ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत प्रभावी राहणार आहे.



पोलीस उपआयुक्त रश्मी नांदेडकर यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, दिवाळीच्या काळात नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रज्वलित आकाशकंदील हवेत सोडले जातात. हे कंदील जमिनीवर येताना आग लागणे, मालमत्तेचे नुकसान किंवा इतर गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही बंदी आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रज्वलित आकाशकंदील उडविणे, विक्री करणे आणि साठा करणे पूर्णपणे प्रतिबंधित असेल. या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

नवी मुंबई पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सण साजरा करताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि कायद्याचे पालन करून इतरांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

# आधार नोंदणीसाठी नवे दर

। रायगड । प्रतिनिधी ।

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या कार्यालयीन ज्ञापनानुसार आधार नोंदणी, अद्यावतीकरण तसेच अनिवार्य बायोमेट्रिक अद्यावतीकरण सेवांसाठी सुधारित दर निश्चित करण्यात आले आहेत. हे नवे दर १ जानेवारी २०२५ ते ३० सप्टेंबर २०२८ या कालावधीत लागू राहणार आहेत.

युआयडीएआयकडून जाहीर केलेल्या दरांनुसार नवीन आधार नोंदणी: निःशुल्क, बाल आधार (५ वर्षानंतर बायोमेट्रिक अद्यावतीकरण): निःशुल्क, अनिवार्य बायोमेट्रिक अद्यावतीकरण (५ ते ७ व १५ ते १७ वयोगटासाठी): निःशुल्क, १७ वर्षांवरील बायोमेट्रिक अद्यावतीकरण: रु. १२५ (जीएसटीसह), सर्वसाधारण आधार अद्यावतीकरण (बायोमेट्रिक + डेमोग्राफिक): रु. १२५ , फक्त डेमोग्राफिक अद्यावतीकरण (नाव, पत्ता, मोबाईल, लिंग इ.): रु. ७५, ओळखपत्र पत्त्याचा पुरावा अद्यावतीकरण: रु. ७५, पोर्टलद्वारे अद्यावतीकरण: रु. ७५ , ई-आधार कलर प्रिंट: रु. ४० ( जीएसटीसह), घरपोच आधार नोंदणी : रु. ७०० ( जीएसटीसह) आकारणी करण्यात येणार आहे.


# बाजारपेठांमध्ये चैतन्य संचारले

## • दिवाळीसाठी आकाशकंदील, पणत्यांचा झगमगाट

। रायगड । प्रतिनिधी ।

दिवाळी आल्यामुळे बाजारपेठामध्ये पणत्या, दिवे, रांगोळी, सजावटीचे साहित्य, मिठाई आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

मुख्य बाजारपेठेसह एसटी स्टँण्ड परिसर, रायगड बाजार येथे विविध आकाराच्या, रंगीबेरंगी पणत्या, आकाशकंदील, रांगोळीचे ठसे बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. दिवाळीचा सण आनंदात साजरा करण्यासाठी नागरिकांची जय्यत तयारी सुरू झाली आहे.



**लहान आकाराच्या पणत्या – ५० ते ७० रुपये डझन**
**मोठ्या रंगीत पणत्या – ८० ते १२० रुपये ४ नग**
**मोठे दिवे – १२० ते २०० लहान कंदील – १००**
**मध्यम आकाराचे कंदील – २५० ते ३५०**
**मोठे कंदील – ५०० ते ३०००.**

सजावटीच्या वस्तू, पणत्या, आकाशकंदील, तोरणे आणि इतर घरगुती सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठांमध्ये गर्दी केली आहे.

# पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना अंमलात

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्य शासनाच्या निर्णयानुसार २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांसाठी पुनर्निर्दिष्ट हवामानावर आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून संरक्षण मिळणार आहे.

या योजनेसाठी एम. अफ्रीड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी आपल्या फळपीकासाठी नोंदणी करून निश्चित मुदतीत विमा हप्ता भरावा. या योजनेत नैसर्गिक घटकांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण मिळणार आहे.काजू फळपीकासाठी १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत अवकाळी पाऊस, कमी तापमान आणि गारपीट यांसाठी विमा लागू राहील. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टर ६,००० निश्चित करण्यात आला असून विमा संरक्षण रक्कम १,२०,००० आहे.आंबा फळपीकासाठी १ डिसेंबर ते ३१ मार्च तसेच १५ मेपर्यंत अवकाळी पाऊस, तापमानातील बदल, वाऱ्याचा वेग आणि गारपीट या नैसर्गिक संकटांपासून विमा संरक्षण मिळणार आहे. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टर १४,४५० असून विमा संरक्षण रक्कम १,७०,००० आहे. शेतकऱ्यांनी आपला ७/१२ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक तसेच जिओ टॅगिंग केलेला फळपीकाचा फोटो सादर करून अर्ज सादर करावा. नोंदणी आणि हप्ता भरण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर आहे.

# दुग्धजन्य पदार्थांवर एफडीएची नजर

। मुंबई । प्रतिनिधी ।

सणासुदीच्या काळात मिठाई, फराळ आणि गोड पदार्थांची मागणी वाढते. मात्र, या काळात दुग्धजन्य पदार्थात भेसळ होण्याची शक्यता जास्त असल्याने अन्न व औषध प्रशासनाने सणासुदीसाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना चांगल्या प्रतिची मिठाई व फराळ उपलब्ध होणे हा आहे. मात्र, ग्राहकांनीही मिठाई खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन एफडीए प्रशासनाने केले आहे. याशिवाय, मिठाईची मुदत संपण्याची ही तारीख त्यावर लिहावी असे आवाहन करण्यात आले आहे.



मिठाई व गोड पदार्थ नाशवंत असतात, त्यामुळे त्यांचे उत्पादन, साठवणूक, मुदतबाह्य तारीख आणि कच्च्या मालाची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. एफडीएने यावर विशेष लक्ष देत तळण्यासाठी एकाच तेलाचा वापर, कृत्रिम रंग निर्धारित मात्रेपेक्षा जास्त न वापरणे आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत

२५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा या नावाने विशेष तपासणी मोहीम राबविणार आहे. या मोहिमेत राज्यात नमुने गोळा कारण्यासोबत नागरिकांना प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतून मार्गदर्शन करण्याचे प्रयत्न होणार आहेत.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थांवर देखील लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. दुधामधून भेसळ रोखणे, पनीरसदृश्य अनालॉग वापर टाळणे आणि गुणवत्तेची नियमित तपासणी करणे या उपाययोजनांमध्ये समावेश आहे. या माध्यमातून कोलेस्ट्रॉल वाढणे, वजन वाढणे आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ नयेत, असा प्रयत्न आहे. मोहीम दरम्यान नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी टोल-फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ वर कळवता येतील.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पुरवठा कमी आणि मागणी जास्त असतानाही भेसळ टाळण्यासाठी नागरिक, अन्न व्यवसायिक आणि शासनाने एकत्र काम करावे, असा आग्रह धरला. मोहिमेच्या उद्धाटनावेळी भेसळयुक्त अन्न खाल्ल्याचे परिणाम दर्शवणारे नाटक आणि चित्रफीत सादर करण्यात आली, तसेच अन्न व्यवसायिकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

# खारघरमध्ये ट्राय सिटी बिल्डिंगला आग

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर उपनगरातील येथील सेक्टर ३४ मधील ट्रायसीटी इमारतीमधून दुपारी धुराचे लोट येऊ लागल्याने परिसरात एकच खळबळ माजली.

रविवारी दुपारी एक वाजून २० मिनिटांनी सेक्टर ३४ मधील ट्राय सिटी बिल्डिंगच्या १० ते १४ व्या मजल्यावर वीजेच्या शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या घटनेनंतर तातडीने अग्निशमन दलाचे जवान बंबासह आणि खारघर पोलीस घटनास्थळी काही वेळात पोहचले. नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

जखमींमध्ये सुमन कुमारी नीरज भारद्वाज (३१), वाणीच नीरज भारद्वाज (९), तेजस्वी राजेश कुमार सिंग (१९) आणि यशस्वी राजेश कुमार सिंग (१६) यांचा समावेश आहे. सर्वांना तातडीने खारघर येथील मेडिसिटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी **मौजे सालवड,** ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| खातेदार नाव | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे. आर. प्रति | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| गणेश दिलीप देवघरे | २४/४ | ०.२४.०० | ०.२० |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि.रायगड मो.नं. ७७९८४३३८८८

सही/-
**ॲड. कैलास अनंत बासरे**


पान १ वरून

### मासेमारीला फटका

मत्स्य दुष्काळाच्या संकटाना मच्छिमारांना सामोरे जाण्याची वेळ येणार आहे. तसेच मासे मिळण्याचे प्रमाण कमी झाल्याने माशांच्या किमतीतही वाढ होणार असल्याने खवय्यांच्या ताटातून मासळी गायब होण्याची शक्यता अधिक्त आहे.

बदलत्या हवामानामुळे मासे मिळण्याचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे हजारों रुपयांचे इंधन खर्च करूनही नौका समुद्रात गेल्यावर मासळी जाळ्यात मिळत नाही. योग्य प्रमाणात मासे मिळत नसल्याने इंधनासह खलाशांचा खर्चही भागत नाही. या परिस्थितीमुळे मच्छिमारांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

मतलई वाऱ्यामुळे मासेमारी नौका समुद्रात नेणे धोकादायक असते. या वाऱ्यामुळे मासे पकडण्यासाठी जाळी टाकण्यात अनेक अडथळे निर्माण होतात. जाळी टाकल्यावर ती गुरफटली जाते. त्यामुळे मच्छिमारांच्या हाती काहीच लागत नाही. त्याचा काहीही फायदा होत नसून उलट मच्छिमारांना नुकसानाना सामोरे जावे लागते.स्थानिक खलाशी मिळत नसल्याने परराज्यातील खलाशी आयात करावे लागत आहेत. त्यासाठी लाखो रुपयांची अनामत रक्कम नौका मालकांना मोजावी लागते. मात्र, अनामत रक्कम घेऊनही अनेक खलाशी पळून जातात.

त्याचा फटका नौका मालकांना बसतो. खलाशांअभावी मासेमारी बंद ठेवावी लागते. डीझेलचा खर्च, बर्फ, खलाशांचा पगार व भत्ता, जाळी व इंजिन दुरुस्ती आदीवर होणारा हजारो रुपयांचा खर्च आणि मासळी विकून मिळणारे तुटपुंजे उत्पन्न याचा ताळेबंदच जुळत नसल्याने मच्छिमार हताश झाले आहेत. त्यातच बँकेचे कर्ज, व्याज तसेच व्याधान्यांकडून ॲडव्हान्स रकमेची परतफेड होत नसल्याने मच्छिमारांची आर्थिक घडी विस्कटली आहे.

### आज आरक्षण सोडत

जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (जागा आरक्षणासबंधीची पद्धत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार ही कार्यवाही केली जाणार आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये ही प्रक्रिया एकाच दिवशी सोमवारी(दि.१३) सकाळी अकरा वाजता आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या आरक्षणाची बैठक दुपारी दोन वाजता होमार आहे. अलिबागमधील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात ही प्रक्रीया राबविली जाणार आहे.

पंचायत समितीचे आरक्षण सकाळी अकरा वाजता सुरु होणार आहे. पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फळके नाट्यगृह, कर्जतमधील प्रशासकीय भवन, तहसलिदार कार्यालय, खालापूरमधील पंचायत समिती, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, सुधागडमधील श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली भक्त निवास, क्र.एक सभागृह,पेणमधील उपविभागीय अधिकारी कार्यालय सभागृह, अलिबागमधील नगरपरिषद सभागृह, मुरुडमधील पंचायत समिती येथील सभागृह, रोहामधील नगरपरिषद ज्येष्ठ नागरिक सभागृह, तळामधील पंचायत समिती येथील डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृह, माणगावमधील तहसील कार्यालयातील मध्यवर्ती प्रशासकीय भवन, म्हसळामधील पंचायत समिती सभागृह, श्रीवर्धनमधील तहसीलदार कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय भवन, महाडमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथील बहुउद्देशीय हॉल, पोलादपूरमधील कॅप्टन विक्रम राव मोरे सभागृह येथे होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

हे आरक्षण चक्री पध्दतीने होणार आहे. त्यामुळे सदस्य पदासाठी बाशिंग बांधून असलेल्यांचा हिरमोड होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### ३० कंपन्यांची तपासणी सुरु

अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मध्य प्रदेशात १० हजार कोटींचा औषधांचा व्यवसाय आहे. त्यासाटी केवळ ७० ड्रग इन्स्पेक्टर आहेत. आता नवीन एसओपी तयार केली जात आहे, त्यामुळे संशयास्पद सॅम्पल थेट प्रयोगशाळेत पोहोचेल आणि २४ तासांच्या आत त्याचा रिपोर्ट येईल.

ड्रग कंट्रोलर श्रीवास्तव पुढे म्हणाले की, मध्य प्रदेशात बनलेल्या साधारण ३० कफ सीरप उत्पादकांची तपासणी केंद्र सरकारच्या सहकार्याने होणार आहे. त्यासाठी केंद्राला पत्र पाठवण्यात आलं असून परवानगी मिळताच या सर्व सीरपची तपासणी सुरु होईल. नागपूरहून मिळालेल्या अलर्टनंतर ज्या अधिकाऱ्यांनी सॅम्पल परीक्षणात दिरंगाई केली, त्यांच्यावर कारवाई झाली आहे.

तपासणीसाठी केवळ तीनच लॅबराज्यासमोर आता सर्वात मोठं संकट हे औषधांची गुणवत्ता तपासणं, हे आहे. १० हजार कोटींच्या या मार्केटमध्ये केवळ ७९ ड्रग इन्स्पेक्टर आहेत. तर नमुन्यांच्या तपासणीसाठी केवळ तीन प्रयोगशाळा आहेत. त्यात फक्त भोपाळची प्रयोगशाळा पूर्ण क्षमतेने सुरु आहे. याच दूरवस्थेमुळे विषारी कफ सीरपचं प्रकरण घडलं. मध्य प्रदेश, नागपूर आणि पांढुर्णासह अनेक जिल्ह्यात आतापर्यंत २२ मुलांचा मृत्यू झाला आहे. यात कोल्ड्रिफ, रीलाइफ आणि रेस्पिफ्रेस टीआर या दूषित औषधांचं कारण ठरलं आहे.

### महामार्गावरील धुळीवर पाणी फवारणीचा उतारा

आलेली चिखलमिश्रित खडीतील धुळीचे लोट महामार्गावर पसरत आहेत. वाहनचालकांना धुळीच्या साम्राज्यातून वाहन चालवणे जिकरीचे बनत आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी बाजारपेठा उद्ध्वस्त करण्यात आल्या. अनेकांना आपल्या व्यावसायावर पाणी सोडावे लागले. तसेच दुकानदारांना कोणतीही सवड न देता त्यांच्या दुकानावर बुलडोजर चालवण्यात आला. परंतु याला अठरा वर्षे पूर्ण होऊन गेलीतरी चौपदरीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही. लोकप्रतिनिधींकडून कित्येकवेळा महामार्गाची पाहणी केली. अनेकवेळा महामार्ग पूर्ण होण्याच्या डेडलाईन देण्यात आल्या तरी महामार्गाचे काम पूर्ण झालेले नाही. रस्त्याला पाण्याची फवारणी करून वेळ व शासनाच्या तिजोरीतील पैसा वाया घालविण्यापेक्षा रस्त्याचे काम सुरु करून यावर्षी तरी पूर्ण करावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### युतीची चर्चा फायनल?

दीपोस्तवाचे आयोजन करण्यात येते. त्या कार्यक्रमाला राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना निमंत्रण दिलं का, उद्धव ठाकरे हे मनसेच्या दीपोस्तवाला हजर राहणार का हे पाहावं लागेल.

तब्बल दोन तास ४० मिनिटांनी राज ठाकरे मातोश्रीवरुन बाहेर पडले. त्यानंतर राज ठाकरे हे त्यांच्या गाडीतून बाहेर पडले. त्यांच्या मागे मित ठाकरे, मिताली ठाकरे आणि उर्वशी ठाकरे यांची गाडी बाहेर पडले.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची शेत मिळकत श्री. रूस्तुम गोदरेज जोशी यांची शेतमिळकत, त्यांचे कुलमुखत्याधारक यांनी कायम खरेदीखताद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरचे मिळकतीबाबत, माझे अशिल आणि शेतकरी लवकरच खरेदीखत करण्याच्या बेतात आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**शेत मिळकतीचे वर्णन**

| गाव | सर्व्हे क्र./ भूमापन क्र. | हिस्सा क्र./ उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू/पैसे |
|---|---|---|---|---|
| गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड | ३०६ | ४ | १-५४-००<br>पो.ख. ०-१०-००<br>एकुण १-६४-५० | २.५६ |

तरी वरील मिळकतीचे वर्णनांत नमुद शेतमिळकतींबाबत कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद, असल्यांस त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत माझे खालील पत्त्यावर पाठवून द्यावी, उपरोक्त दिवसांत जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार खालील पत्त्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : धुतूम, उरण
ता. १३/१०/२०२५

सही/-
**ॲड. किशोर धनाजी ठाकुर**
कार्यालय: ऑफीस क्र. २, जय भवानी संकुल,
जय भवानी पेट्रॉल पंप जवळ,
जे.एन.पी.टी -कळंबोळी रोड,
पौंडखार गाव, पो. जासई
(व्हाया पनवेल - ४१०२०६) ता. उरण, जि. रायगड.

## निवडक



### नूपुर डान्स अकॅडमीची झळाळती कामगिरी

**मुरूड –जंजिरा :** न्यूझीलंडच्या दिवाळी महोत्सवात भारतीय कलाविश्वाची झलक झळकली आहे. यावेळी नृत्यकलेचा अनोखा ठसा उमटवत नुपूर डान्स अकॅडमी ला उद्घाटन सोहळ्यात सादरीकरण करण्याचा सन्मान मिळाला. या सोहळ्यालर न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्तोफर लुक्सन तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. अकॅडमीच्या प्रतिनिधींना पंतप्रधानांशी काही क्षण संवाद साधण्याची संधीही मिळाली. हा क्षण सर्वांसाठी अभिमानास्पद ठरला असल्याचे मत संचालिका मानसी कामोद नामजोशी यांनी व्यक्त केला. त्यांच्यासोबत त्यांची कन्या अनुषा हिचा देखील सहभाग होता. मानसी नामजोशी या रायगड जिल्ह्यातील मुरूड-जंजिरा गावातील रहिवासी आहेत. आपले पती कामोद नामजोशी यांच्या समवेत त्या व्यवसायानिमित्त ऑकलंड येथे निवास करत आहेत. या महोत्सवात अकॅडमीच्या लहानग्या कलाकारांनी रंगमंचावर आपल्या सुंदर नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. पारितोषिक न मिळालं तरी परीक्षकांकडून विशेष उल्लेख मिळाल्याने संपूर्ण टीममध्ये आनंदाचे वातावरण होते.




### माथेरान व्यवस्थापन समितीचा दौरा

**नेरळ :** नेरळ-माथेरान मिनीट्रेन मार्गवरील स्थानकात असलेल्या हेरिटेज रेल्वे स्थानकाचा पर्यावरणपूरक विकास व्हावा, अशी मागणी स्थनिक रेल्वे व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी केली आहे. या रेल्वे मार्गावर पूर्वी मोठ्या प्रमाणात परदेशी पर्यटक प्रवास करून येत आणि माथेरानमधील निसर्गाचा आशावाद घेत होते. मात्र, मागील काही वर्षांत फार तुरळक विदेशी पर्यटक माथेरानमध्ये येत असून विदेशी पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी रेल्वेकडून प्रवासी पर्यटकांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी केली. माथेरान रेल्वे स्टेशनमध्ये पर्यटकांना भेडसावत असलेल्या समस्या तसेच स्थानक परिसरातील स्वच्छते बाबतीत महत्वपूर्ण विषयांवर व्यवस्थापन कमिटीची बैठक पार पडली. यावेळी माथेरान रेल्वे स्टेशन व्यवस्थापन समितीचे सदसय माजी उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव आणि माजी नगरसेवक प्रदीप घावरे आदी उपस्थित होते. मध्य रेल्वेकडून कम र्शियल अभियंता शिरीष कांबळे हे पाहणी दौऱ्यात उपस्थित होते.




### मेगा ब्लॉकमुळे वाहतूक कोंडी

**नेरळ :** नेरळ ते कर्जत पुढे खोपोलीपर्यंतची लोकसेवा बंद असल्यामुळे नेरळमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली आहे. काही लोकल नेरळ येथून पुन्हा परत पाठवण्यात येत आहेत. त्यामुळे खोपोलीपासून भिवपुरीपर्यंतचे प्रवासी नेरळ येथे पोहचले. त्यामुळे नेरळमधील रेल्वेची पार्किंग वाहनांनी फुल्ल झाली असून सर्वत्र वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. नेरळ ते कर्जत लोकल सेवा बंद असल्यामुळे खोपोली येथून नोकरदार वर्ग नेरळ स्टेशन वर येण्यासाठी पोहचत आहे. कर्जत स्थानकाच्या यार्ड चे अभियांत्रिकी कामासाठी दोन दिवसांचा मेगा ब्लॉक घेण्यात आला आहे. नेरळ ते कर्जत पुढे खोपोली या रेल्वे मेगाब्लॉक असल्याने शनिवारी (दि.११) नेरळ शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. कर्जत आणि भिवपुरी रोड स्टेशन या दोन स्थानकावरून मोठ्या प्रमाणात चाकरमानी नोकरीच्या ठिकाणी जाण्यासाठी बदलापूर, अंबरनाथ, कल्याण, ठाणे आणि मुंबई या शहराच्या ठिकाणी जात असतात. मात्र, या चाकरमान्यांना कर्जतवरून तसेच भरपूर रोड स्टेशन या दोन स्टेशनवरून लोकल पकडावी लागते. त्यानंतर हे चाकरमानी आपल्या कामासाठी त्या शहरांमध्ये जाऊन पोहचत आहेत. त्यामुळे नेरळ गावात तसेच परिसरात आणि बाजारपेठेत वाहनेच वाहने दिसून येत आहेत.

### रेशनिंग परवाना रद्द करण्याची मागणी



**कोलाड :** आपल्या फायद्यासाठी छुप्या मार्गाने रेशनिंग धान्य विक्री करणाऱ्या रेशन पुरवठा दुकानदार शरद उर्फ नाना शिंदे याचा परवाना रद्द करावा, अन्यथा रोहा तहसीलदारांच्या कार्यालयासमोर रेशनिंग ग्राहकांना घेऊन उपोषण करण्यात येईल, असा इशारा चिंचवली तर्फे अतोणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय मोते यांच्याकडून देण्यात आला आहे. गारभट येथील रेशनिंग दुकानदाराने रेशनिंगचे धान्य छुप्या पद्धतीने रविवारी (दि.५) पाली येथील धनधांडग्या व्यापाऱ्याला विकण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सामान्य जनतेसाठी आलेले धान्य बेकायदेशीररित्या वाहतूक करणारा धान्य पुरवठा धारक शरद उर्फ नाना शंकर शिंदे याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले. त्याच्यासह पोलिसांनी चार आरोपीं विरोधात गुन्हा दाखल केला असून ५ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. त्यामुळे रेशन पुरवठा दुकानदार शरद उर्फ नाना शिंदे यांचा परवाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी चिंचवली तर्फे अतोणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय मोते यांनी केली आहे.

# खोरा बंदरातील कामे निकृष्ट





**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदर अंतर्गत प्रवासी जेट्टीचे काम पूर्ण झाले आहे. ही जेट्टी जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या पर्यटकांसाठी बांधली असून अद्याप त्याचे उद्घाटन झालेले नाही. तरी या जेट्टीच्या प्रवासी उतरण्याच्या पायरीचे स्लॅप फुटले असून ते कधीही पडतील व अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच, मुख्य रस्त्यापासून खोरा बंदराकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची देखील अवघ्या सहा महिन्यांत दुरवस्था झालेली आहे. त्यामुळे जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या पर्यटकांचा जीव धोक्यात घालण्यापेक्षा उद्घाटनाआधी जेट्टीची दुरुस्ती करण्याची मागणी होत आहे.

मुरुड तालुक्यातील राजापुरी येथील ऐतिहासीक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी देशभरातून हजारोंच्या संख्येने पर्यटक याठिकाणी येत असतात. पावसळ्यात हा किल्ला सर्वसामान्यांसाठी बंद ठेवला जातो. त्यामुळे या दिवसांत पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिंकाना फार मोठा तोटा सहन करावा लागतो. आता पावसाळा संपुष्टात आला असून काही दिवसांपूर्वी जंजिऱ्याचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी खुले करण्यात आले आहेत. असे असतानाही पर्यटकांसह व्यवसायीकांचा मोठा हिरमोड होताना दिसत आहे. पर्यटकांची संख्या वाढवावी व त्यांचा सुखाचा प्रवास व्हावा याकरिता शासनाने करोड रुपये खर्च करून मुख्य रस्त्यापासून ते खोरा बंदर कार्यालयापर्यंत तसेच जेट्टी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे काम पूर्ण करुन घेतले आहे. परंतु, हा रस्ता ठेकदराच्या निष्काळजीपणामुळे सहा महिन्यांच्या आतच उखडला गेला आहे. येथील अंतर्गत रस्त्यांमधुन सिमेंटचा भुसा व दगडे बाहेर येऊन रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या कामाची वस्तुस्थिती पाहता संबंधित ठेकेदाराने फक्त पैसे लाटण्याच्या उद्देशाने हे काम केलेल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असून एखादी दुचाकी जरी गेली तरी या रस्त्यावरचा सिमेंटचा भुसा उडुन पादचारी पर्यटकांच्या नाका-तोंडात जात आहे. पाऊस पडत असताना तर या रस्त्याला अक्षरशः तळ्याचे स्वरूप येते.

त्यातच याठिकाणी नव्या जेट्टीची उभारणी करण्यात आली आहे. तिचे अद्याप उद्घाटन देखील झाले नसतानाही जेट्टीची दुरवस्था झालेली आहे. या जेट्टीच्या प्रवासी उतरण्याच्या पायरीचे स्लॅप फुटले असून ते कधीही पडतील व मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने या कामांसाठी खर्च केलेले करोडो रुपयांचा चुराडा झाल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. नुकतेच जंजिरा किल्ला सर्वसामान्यांसाठी खुला करण्यात आला असून तुरळक प्रमाणात पर्यटक येण्याची सुरवात झाली आहे. परंतु, येथील परिस्थिती पाहता पर्यटक काढता पाय काढतील आणि स्थानिकांवर उपासमारीची वेळ येऊ शकते, अशी भिती व्यक्त केली जात आहे.

**उद्घाटनाधीच जेट्टी, रस्त्याची दुरवस्था**

**शासनाच्या करोडो रुपयांचा चुराडा**

### ठेकेदारासह अधिकाऱ्यांची मुजोरी

या रस्त्यावर टाकण्यात आलेले गतिरोधक अतिशय चुकीच्या पद्धतीने बनवण्यात आले आहेत. ते रूंदीला कमी असून उंचीला मोठे असल्याने त्यावरून जाणारी वाहने जोरात आपटतात. अनेक वाहनांना नुकसान देखील सहन करावे लागत असून अपघाताच्या घटना देखील घडत आहेत. याबाबत संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. परंतु, मुजोर अधिकारी व ठेकेदार यांच्याकडून जाणिव पूर्वक दुर्लक्ष केले जात असल्यामुळे सर्वसामान्यांसह पर्यटकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे शाससनाच्या करोडो रुपयांचे नुकसान करणारा ठेकेदार व त्यांना सहकार्य करणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. तसेच, या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

> खोरा बंदर जेट्टी कामात त्रुटी असल्याचे अनेकवेळा दाखवून देखील ठेकेदार काम पूर्ण करत नसल्याने त्याला नोटीस देण्यात अली आहे. रस्त्याचे काम पुन्हा नवीन टेंडर काढून लवकरच सुरु करण्यात येणार आहे. तसेच, जेट्टीच्या कामाचे परीक्षण झाल्याशिवाय पर्यटकांना जाण्यासाठी ती खुली होणार नाही.
>
> – प्रमोद राऊळ, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

## वाहतूक कोंडीने उरणकर बेजार



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जेएनपीए पोर्ट आणि त्यावर आधारित असलेल्या चार पोर्टमधून एकाच वेळी प्रचंड प्रमाणात अवजड वाहतूक बाहेर पडते. तसेच, पोलीस प्रशासनाच्या नियोजनाचा अभाव आणि दुर्लक्षामुळे उरणच्या रस्त्याने वाहतूक कोंडीचा उच्चांक गाठला गेला आहे. वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना तब्बल दोन-दोन तास वाहतूक कोंडीत अडकावे लागत असून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची लवकरात लवकर सुटका करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. दरम्यान, उरण वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहीफळे यांनी सांगितले की, पोर्टमधून एकाच वेळी वाहतूक होते. २५% वाहतूक वाढल्याने पोलिसांवर ताण पडत आहे. पार्किंग व्यवस्थेचा अभावामुळे अनधिकृत यार्डची वाहने रस्त्यावर उभी असतात. तसेच, अवजड वाहनांमुळे येथील रस्ते खड्डेमय झाले असून वाहतुकीचा वेग मंदावतो आणि वाहतुक कोंडी होते, असे त्यांनी सांगितले.

## कचरा व्यवस्थापन फक्त कागदावरच



**पाली नगरपंचायतीकडून सार्वजनिक निधीचा उपव्यय**

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली नगरपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी मंजूर करण्यात आलेली इन्सिनेटर मशीन गेल्या दीड वर्षांपासून निष्क्रिय अवस्थेत पडून आहे. शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर झालेल्या या यंत्रणेचा वापर न झाल्यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा चर्चा पाली शहरात होत आहेत.

महाराष्ट्र नगरपंचायत अधिनियम १९६५ व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार प्रत्येक नगरपंचायतीने ओला व सुका कचऱ्याचे स्वतंत्र संकलन, प्रक्रिया व विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. मात्र, पाली नगरपंचायतीकडून या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. नगरपंचायतीच्या डम्पिंग ग्राउंडवर ओला व सुका कचरा एकत्रितपणे टाकला जात असून कोणतीही वैज्ञानिक प्रक्रिया राबवली जात नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच, संरक्षण भिंत नसल्यामुळे कचरा रस्त्यावर पसरतो आणि दुर्गंधी निर्माण होते. त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांकडून इन्सिनेटर मशीन कार्यान्वित करणे, डम्पिंग ग्राउंडला संरक्षक भिंत बांधणे आणि कचरा वर्गीकरणाची प्रक्रिया सुरू करणे यासाठी नगरपंचायतीकडे लेखी मागणी केली आहे. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कृती न झाल्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## काशिद समुद्रकिनारा पर्यटकांनी फुलला



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

पर्यटनात जगाच्या पटलावर नावारूपाला आलेल्या काशिद समुद्रकिनाऱ्यावर पावसाळ्यानंतर ऑक्टोबरच्या दुसऱ्या आडवड्यात पर्यटकांनी हजेरी लावली आहे. त्यामुळे काशिद समुद्रकिनारा पर्यटकांनी फुलला असून पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या स्थानिक व्यावसयिकांचे सुगिचे दिवस आल्याचे बोलले जात आहे.

काशिद समुद्रकिनारा पावसाळ्यातील चार महिने पुर्णपणे बंद ठेवण्यात येतो. या ठिकाणी पाण्यात बुडून अपघात होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून पावसाळ्यात कोणालाही काशिद समुद्रकिनारी फिरकायलाही परवानगी नसते. आता पावसाने विश्रांती घेतल्यामुळे पर्यटकांची रेलचेल हळूहळू वाढू लागली आहे. पावसाळ्यानंतर शनिवारी (दि.११) मुरुडमधील समुद्रकिनाऱ्यांवर शुकशुकाट दिसून येत होता. मात्र, रविवारी (दि.१२) काशिद समुद्रकिनाऱ्यावर सकाळच्या वेळेत पर्यटक मौजमजा करीत पर्यटनाचा आनंद लुटत होते. येथील रत्याच्या दुतर्फा पर्यटकांच्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. काशिद समुद्रकिनाऱ्यावर भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील शुभ्र वाळू पर्यटकांना आकर्षित करते. पर्यटकांच्या सोयी-सुविधांसह स्पीडबोट, पॅरेसेलिंगबोट, बनाना, बंफर तसेच घोडा व उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. तसेच, पर्यटकांच्या हजेरीमुळे येथील व्यावसयिक देखील सुखावला आहे.

## ॲड. भगत यांच्या कार्यालयाचे उद्घाटन



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

पाली येथील ॲड. सागर भगत यांच्या खडकआळी येथील नूतन कार्यालयाचे उद्घाटन शनिवारी (दि.११)करण्यात आले.हाउद्घाटन समारंभ शेकापचे खजिनदार अतुल म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थिती पार पडला. यावेळी पालीचे नगराध्यक्ष पराग मेहता, ॲड. नितीन शेवाळे, ॲड. सुभाष पाटील, ॲड. धनंजय धारप, संजयकुमार शहा, ॲड. प्रवीण कुंभार, ॲड. दिनेश उफाळे, ॲड. वैभवी सावंत आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## अतिवृष्टीने भातपिके कुजली



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सद्यस्थितीत नैसर्गिक आपत्ती, ओला व कोरडा दुष्काळ, अतिवृष्टीने शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झाला आहे. शेतकऱ्यांचे सोन्यासारखे पीक मातीमोल झाले आहे. या परिस्थितीने शेतकरी हवालदिल झाला असून अतिवृष्टीने शेतकऱ्यांना रडवले आहे. त्यामुळे सरकारने सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

सतत कोसळणाऱ्या पावसामुळे शिहू बेणसे विभागातील शेतात पाणीच पाणी झाले असून भाताचे रोप पूर्णपणे पाण्यात बुडाले आहे. खाडीलगत असलेली शेती अक्षरशः पाण्याखाली आली गेली आहे. गुडघाभर चिखलात जाऊन शेतकरी पीक सावरण्यासाठी धडपडत आहेत; मात्र, त्याची अवस्था केविलवाणी झाली आहे. काही भागांत कापणीला आलेली भातपिकं चिखलात रुतून त्याला कोंब आले असून पीकांची कुजण्याची प्रक्रिया देखील सुरू झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. एकीकडे उत्पादन घटल्याने कुटुंबाला वर्षभर लागणारा भात उपलब्ध होणार नाही, तर दुसरीकडे बाजारातून महागडे भात धान्य विकत घ्यावे लागेल. महागाईच्या काळात हा खर्च शेतकऱ्यांच्या परवडणाऱ्या पलीकडे जाणारा आहे.

**जिल्ह्याला लागले दिवाळीचे वेध | साहित्यांची दुकाने सजण्यास सुरूवात**

# आकाश कंदीलांनी बाजारपेठा उजळल्या



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नवरात्रौत्सवानंतर आता दिवाळीचे वेध लागले आहेत. जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये रांगोळी व फटक्यांसह आकाश कंदीलांची देखील दुकाने सजण्यास सुरूवात झाली आहे. दिवाळीला काही दिवसांचा अवधी शिल्लक राहिला असून ग्राहकांनी पसंतीचे कंदील खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. यंदा प्लास्टिक कंदीलांसह कागदी कंदीले देखील बाजारात विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. यावर्षी कंदीलाच्या किंमतीमध्ये काही प्रमाणात घट झाल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली आहे.

दिवाळीमध्ये करंज्या, चकल्या आदी फराळ खाण्याचा आनंद घेताना वेगवेगळ्या आकाराचे व रंगांचे लहान-मोठे कंदील घरासमोर लावण्याचा आनंददेखील मोठा असतो. त्यामुळे घरासमोर कोणत्या प्रकारचे कंदील असावे, याचे नियोजन काही ठिकाणी केले जात आहे. तर, काहीजणांनी बाजारात उपलब्ध असलेले आकर्षक कंदील खरेदी करून ते घरासमोर लावायला सुरूवात देखील केली आहे. यंदा लहान कंदीलासंह मोठ्या कंदीलांचा झगमगाट कायमच नागरिकांना एक वेगळा उत्साह देणारा ठरणार आहे.

यंदा दिवाळी सण शुक्रवार दि.१७ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहे. शुक्रवारी वसूबारस असून शनिवारी (दि.१७) धनत्रयोदशी, सोमवारी (दि.२०) नरक चतूर्दशी, मंगळवारी (दि.२१) लक्ष्मीपूजन, बुधवारी (दि.२२) बलिप्रतिपदा आणि गुरुवारी (दि.२३) भाऊबीज आहे. तसेच, दिवाळीनिमित्त शाळा व महाविद्यालयांना सुट्टी असते. त्यामुळे या कालावधीत जिल्ह्यात मोठा जल्लोष साजरा होणार आहे. दिवाळी सुरु होण्यासाठी आठ दिवस शिल्लक राहिले आहेत. दरम्यान, बाजारपेठांसह ठिकठिकाणी फटाके, रांगोळया व आकाश कंदील विक्रीसाठी दुकाने उभारू लागली आहेत. बाजारपेठेत शंभर रुपयांपासून साडेसहाशे रुपयांपर्यंत कंदील विक्रीसाठी आहेत. त्यामध्ये कागदी व प्लास्टिकच्या कंदीलांचा समावेश आहे. गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी कंदीलच्या किंमतीत घट झाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे. बाजारपेठेतील लहान कंदील १५ रुपयांपासून २० रुपयांपर्यंत आहेत. हे कंदीलदेखील जिल्ह्यातील विविध बाजारांत विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# फसवणुकीचा कहर

यंदा पावसाने कहर केला. पण आता फडणवीस सरकारच्या फसवणुकीचा कहर चालू आहे. मराठवाडा व इतर भागातील अतिवृष्टीग्रस्तांसाठी राज्य सरकारने मोठ्या थाटामाटात ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. पण प्रत्यक्षात हे पॅकेज बोगस आहे. गुरुवारी याबाबत जो शासन निर्णय प्रकाशित झाला आहे त्यात या रकमेचा कोठेही उल्लेख नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे शेतकरी नेते अजित नवले यांनी या कथित सरकारी पॅकेजची चिरफाड केली असून ३१ हजार कोटींमध्ये नवे काहीच नाही हे दाखवून दिले आहे. यात नवी मदत केवळ साडेसहा हजार कोटी रुपयांची असून बाकी सगळ्या जुन्या योजनांखालील मदतीचीच गोळाबेरीज करण्यात आली आहे. यंदा मे महिन्यातच अनेक भागात पाऊस सुरू झाला. त्यानंतर जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात कोणत्या ना कोणत्या भागात अतिवृष्टी झाली. नांदेड जिल्ह्यात तर तीनदा पुराचा तडाखा बसला. यासाठी ऑगस्टपर्यंत सरकारने काही मदत जाहीर केली होती. पण सप्टेंबरात नवरात्रीच्या काळात मराठवाड्यात झालेली अतिवृष्टी सर्वांवर ताण करणारी ठरली. असा पूर गेल्या शंभर वर्षात कोणी पाहिलेला नाही असे जागोजागचे शेतकरी सांगतात. धाराशिवसारख्या कायम दुष्काळी भागात भूम, परांडा वगैरे तालुक्यात कोकणापेक्षाही भारी पाऊस दहा-बारा तासांमध्ये झाला. विशेष म्हणजे या पावसाच्या पाण्याचा तडाखा इतका जबरदस्त होता की त्याने शेतातील माती पूर्णपणे वाहून गेली. जमिनीला पाच ते दहा फुटांचे खड्डे पडले. बांधकामासाठी खड्डे मारावेत तसे दृश्य कालपर्यंत उभी पिके असणाऱ्या शेतांमध्ये दिसू लागले. गाईगुरे वाहून गेली. घरे वगैरे पडली, रस्ते वाहून गेले व उभे पीक नष्ट झाले ते वेगळेच. सप्टेंबरातील पुराची ही अभूतपूर्व स्थिती लक्षात घेऊन सरकार स्वतंत्र व भरघोस मदतीचे पॅकेज जाहीर करील अशी सर्वांची अपेक्षा होती. पण फडणवीस सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला निव्वळ पाने पुसली आहेत. अर्थात, हे फडणवीस सरकारच्या आजवरच्या कारभाराला साजेसेच म्हणावे लागेल.

## 'मनरेगा'वर तुळशीपत्रे

यंदा पंजाबमध्येही नेमकी अशीच अतिवृष्टी झाली होती. तेथील सरकारने हेक्टरी ५० हजार भरपाई जाहीर केली होती. पंजाबातील गहू व तांदुळ सरकारी पातळीवर सालोसाल हमीभावाने खरेदी होत असल्याने तेथील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अतिशय चांगली आहे. शिवाय ते वर्षातून दोन किंवा तीन पिकेही घेऊ शकतात. मराठवाड्यात पूर आला तो बहुतांश भाग कोरडवाहू शेतीचा आहे. खरिपाचा हंगाम हाच तिथे मुख्य. शिवाय कापूस व सोयाबीन ही मुख्य पिके गेल्या काही वर्षांपासून तोट्यातच चाललेली आहेत. अशा स्थितीत मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अधिक मदतीची अपेक्षा व गरजही होती. पण महाराष्ट्र सरकारने कोरडवाहू प्रति हेक्टरी म्हणजे अडीच एकरांसाठी केवळ १८५०० आणि बागायती पिकांसाठी हेक्टरी २७००० रुपये देऊ केले आहेत. सरकारची यात चालबाजी अशी आहे की, पीकविम्याचे पैसे यातच घुसवलेले आहेत. हे पैसे खासगी कंपन्या देणार आहेत. मात्र त्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया आहे. हे देणे संभाव्य प्रकारचे आहे. कंपन्या ते नाकारूही शकतात. मात्र पीक विम्यातून कमीत कमी ५ हजार कोटी रुपये मिळतील असे गृहित धरून आपला आकडा सरकारने ३१ हजार कोटींवर नेऊन ठेवला आहे. पीक विम्याचा फायदा मोजक्याच शेतकऱ्यांना होतो हा नित्याचा अनुभव आहे. यापूर्वी कोकणात वादळामुळे झालेल्या नुकसानीच्या वेळी शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी दक्षिणा दिल्यासारखे हजार वा पाचशे रुपये हातावर टेकले होते. सर्वत्र हेच प्रकार होत असतात. यातूनच विमा कंपन्या दरवर्षी किमान दहा हजार कोटींचा नफा मिळवत असतात. पण यांना चाप लावण्याची हिंमत सरकारमध्ये नाही. माती खरवडून गेल्याबद्दलच्या भरपाईचेही असेच हलवायाच्या घरावर तुळशीपत्र आहे. एकतर अडीच किंवा तीन एकरांपर्यंतच्या शेतकऱ्यांनाच ही भरपाई मिळणार आहे. पाच किंवा दहा एकरवाल्यांना यातून काहीच हाती लागणार नाही. ज्यांना भरपाई मिळणार आहे त्यांनाही सरकारी चक्रातून पिळून निघावे लागणार आहे. महात्मा गांधी रोजगार योजनेमार्फत कामे घेऊन ही जमीन सारखी करून दिली जायची आहे.

## केंद्राकडून एक पैसाही नाही

सरकारने माती वाहून गेलेल्यांना थेट मदत हेक्टरी ४७ हजार रुपये जाहीर केली आहे. पण आकडा मात्र साडेतीन लाखांच्या मदतीचा सांगितला आहे. कारण, तीन लाख रुपयांपर्यंतची माती भरण्याची व जमीन सारखी करण्याची कामे मनरेगामार्फत केली जाणार आहेत. यासाठी शेतकऱ्याला सरकारकडे अर्ज करून वाट पाहत बसावे लागेल. यापूर्वी शेतातील विहिरीही मनरेगाखाली बांधून दिल्या जायच्या होत्या. पण त्याचे हजारो अर्ज पडून आहेत. तीच गत या कामाचीही होणार आहे. मदत देताना सरकारने पूर व नुकसानीचे लावलेले निकष अजब आहेत. ३१ जिल्ह्यातील २५३ तालुक्यांचा यात समावेश आहे. पण पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या नांदेडचा समावेशच नाही. नांदेडमध्ये ऑगस्टमध्ये सुमारे साडेसहा लाख आणि सप्टेंबरमध्ये त्याहूनही अधिक म्हणजे सात लाख २८ हजार हेक्टर जमिनीवरील पिकांना फटका बसला होता. पण असे असूनही त्याला वगळण्यात आले आहे. मंत्रालयात बसलेल्या बाबू लोकांनी अशा आणखी काय गमती केल्या आहेत हे अधिक बारकाईने तपास केल्यावर त्या त्या जिल्ह्यातील लोकांना कळेलच. सरकारने दुभती जनावरे, नांगर किंवा गाडीला जोडले जाणारे बैल वा रेडे यांच्यासाठी दिलेली मदतही अगदीच नगण्य आहे. शिवाय यात फक्त केवळ शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार आहे. गावांमध्ये शेतमजूर तसेच इतर कामधंदे करणारे गरीब लोक राहतात. त्यांचे नुकसान व त्यांचा बुडालेला रोजगार यांचा इथे विचारदेखील नाही. ३१ जिल्ह्यातील या शेतकऱ्यांचा खरीप हंगाम तर गेलाच, पण रबीमध्येही पिके पेरण्याच्या अवस्थेत ते नसणार. म्हणजे जवळपास एक वर्षभर कोणतेही उत्पन्न नाही अशा अवस्थेत त्यांना दिवस काढावे लागतील. अशा वेळी केवळ जुजबी एखाद वेळचे जेवण देऊन मदत केल्यासारखे करणे हे सरकारला शोभत नाही. त्यांनी इतरही उपाय योजायला हवेत. कर्जमाफी करा ही मागणी आहेच. तिचा विचार करायला हवा. सरकारची तिजोरी रिकामी आहे हे तर दिसते आहेच. लाडकी बहीण योजनेसाठी दर महिन्याला सुमारे तीन हजार कोटी रुपये द्यावे लागत आहेत. काही दिवस ही योजना स्थगित ठेवून पैसे उभारायला हवेत. सर्वात महत्वाचे म्हणजे केंद्राने अजून एक पैसाही मदत जाहीर केलेली नाही. गुजरातमध्ये थोडाही पाऊस झाला की मोदी लगेच पाहणीसाठी जातात व भरघोस मदत जाहीर होते. इथे मात्र प्रस्ताव पाठवा, मग पाहू असा कारभार चालू आहे. फडणवीसांच्या महाराष्ट्राची हीच दिल्लीतील पत दाखवून देण्याचा हा एक प्रकार आहे.

विचार

# ट्रॉफीचोरांचा रडीचा डाव

***एकमेकांना पर्याय ठरत आणि आपापली खेळी जबाबदारीने खेळत भारताने आशिया चषकावर नाव कोरले. पाकिस्तानला मात्र हा पराभव युद्धातील पराजयासारखा वाटला. स्पर्धेतील पराभवानंतर पाकिस्तानी संघाचा कप्तान तसेच आशिया क्रिकेट संघटनेच्या अध्यक्षांचे वागणे हास्यास्पद होते. अशा प्रसंगी चषक चोरून नेण्यापर्यंत एखाद्या देशाच्या नेत्याची मजल जात असेल, तर त्यात खिलाडूपणा नसून पराभवाचे शल्य जास्त आहे.***



अखिलेश बांदेकर

'तुम्ही आमचे ध्येय काय आहे असे विचारता. उत्तर फक्त एकच शब्द आहे, 'विजय.' कोणत्याही किंमतीत विजय. दहशतीतही विजय. मार्ग कितीही कठीण असला, तरी आपण जिंकलेच पाहिजे,' दुसऱ्या महायुद्धादरम्यान ब्रिटिश पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा संसदेत भाषण करताना विन्स्टन चर्चिल यांनी केलेले हे भाषण नेहमीच चर्चेत राहिले. पाकिस्तानविरुद्ध आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारताची परिस्थिती अशीच होती. पहलगाम हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर'नंतर निर्माण झालेल्या वातावरणात पराभवाचा प्रश्नच नव्हता. अंतिम सामन्यात पाकिस्तानला हरवणे आणि जिंकणे हा एकमेव पर्याय होता. आणि तो विजय २२ वर्षीय तरुण फलंदाज तिलक वर्माने मिळवला. त्याने प्रचंड दबावाखाली खेळताना स्वतःला हिरो सिद्ध केले. तिलकच्या कारकिर्दीतील सर्वात मौल्यवान डावाची अधिक तपशीलवार चर्चा केली पाहिजे. प्रथम, सामन्याचा संक्षिप्त स्कोअर लक्षात घ्या. १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने २० धावांमध्ये तीन विकेट्स गमावल्या होत्या. अंतिम सामन्यापूर्वी प्रत्येक सामन्यात खळबळ माजवणारा अभिषेक शर्मा पाच धावांवर बाद झाला. कर्णधार सूर्यकुमार यादवला फक्त एक धाव करता आली. शुभमन गिललाही १२ धावांपर्यंत पोहोचता आले नाही. यानंतर, वर्माने प्रथम संजू सॅमसनसोबत ५७ धावांची भागीदारी केली आणि नंतर शिवम दुबेसोबत ६० धावांची भागीदारी केली आणि भारताचा विजय निश्चित केला. तथापि, विजयाचा टप्पा रिंकू सिंगने गाठला. तो स्पर्धेतील त्याचा पहिला सामना खेळत होता. त्याने शेवटच्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर चौकार मारला आणि भारताला अत्यंत आवश्यक असलेला विजय मिळाला.

सुपर फोर सामन्यानंतर पाकिस्तानी वेगवान गोलंदाज हरिस रौफने भारतीय खेळाडू आणि चाहत्यांना चिडवण्यासाठी विमान पाडल्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. गेल्या चार महिन्यांपासून पाकिस्तानी लोक 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान सहा भारतीय विमाने पाडल्याच्या अफवा पसरवत आहेत. रौफचा इशारा त्याच दिशेने होता. तथापि, अंतिम सामन्यात रौफ स्वतः भारताविरुद्ध तोंडावर आपटला. तो सामन्यातील सर्वात महागडा गोलंदाज ठरला. त्याने फक्त ३.४ षटकांमध्ये ५० धावा दिल्या. पाकिस्तानच्या डावात, रौफला जसप्रीत बुमराहने बाद केले. विकेट घेतल्यानंतर बुमराहने रौफला विमान अपघाताचे संकेत देऊन योग्य उत्तर दिले. नंतर, भारतीय फलंदाजांनीही रौफला फटकारले आणि जल्लोश केला. भारताचा युवा सलामीवीर अभिषेक शर्माला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू घोषित करण्यात आले. अभिषेकने दोनशेच्या 'स्ट्राईक रेट'ने तीन अर्धशतकांसह स्पर्धेत ३१४ धावा केल्या. तो एकाच टी-२० आशिया कपमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाजही ठरला. या स्पर्धेत अभिषेकने सातपैकी सहा डावांमध्ये ३० पेक्षा जास्त धावा केल्या.

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा पाच विकेट्सने धुव्वा उडवल्यानंतर भारतीय संघाने नवव्यांदा आशियाई अजिंक्यपद जिंकले. ६९ धावांची नाबाद इनिंग खेळणारा आणि एक बाजू लावून धरणारा तिलक वर्मा भारताच्या विजयाचा नायक ठरला. वस्तुतः त्याची खेळी निर्णायक ठरली. पाकिस्तानच्या १४७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाची सुरुवात खराब झाली. फलकावर वीस धावा लागल्या असताना संघाने अभिषेक शर्मा, शुभमन गिल आणि सूर्यकुमार यादव यांच्या विकेट गमावल्या. तथापि, संजू सॅमसन आणि तिलक वर्मा यांनी चौथ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. संजू २४ धावांवर बाद झाला. त्यानंतर शिवम दुबे आणि तिलक यांनी अर्धशतकी भागीदारी केली. तिलक वर्माने ५३ चेंडूंमध्ये नाबाद ६९ धावा केल्या, ज्यात तीन चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. शिवम दुबेने २२ चेंडूत ३३ धावा केल्या, तर संजू सॅमसनने २१ चेंडूत २४ धावा केल्या. पाकिस्तानी फलंदाज भारतीय फिरकीपटूंच्या जाळ्यात अडकले आणि संपूर्ण संघ १४६ धावांवर बाद झाला. पाकिस्तान पूर्ण २० षटके खेळू शकला नाही. पाकिस्तानच्या फरहान आणि फखर या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ८४ धावा जोडून चांगली सुरुवात केली. तथापि, त्यानंतर पाकिस्तानने हार मानली. कुलदीप यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय फिरकीपटूंनी शानदार काम गिरी केली. कुलदीपने चार बळी घेतले, तर अक्षर आणि वरुणने प्रत्येकी दोन बळी घेतले. बुमराहने दोन बळी घेतले.

पाकिस्तानकडून साहिबजादा फरहानने ३८ चेंडूत ५७ धावा केल्या. त्यात पाच चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता, तर फखर झमानने ३५ चेंडूत ४६ धावा केल्या. सॅम अयुबला फक्त १४ धावा करता आल्या. इतर कोणत्याही फलंदाजाने दुहेरी आकडा गाठला नाही. आशिया कपच्या अंतिम फेरीत 'टीम इंडिया'ने पाकिस्तानला पराभूत केले; परंतु दुबई इंटरनॅशनल स्टेडियममध्ये घडले ते सध्या चर्चेचा विषय आहे. सामना मध्यरात्री बारा वाजता संपला; परंतु सामन्यानंतरचे पारितोषिक वितरण पहाटे सव्वा वाजेपर्यंत सुरू झाले नव्हते. भारतीय क्रिकेट संघाने पीसीबी आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्याकडून आशिया कप ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. सामन्यानंतर सादरीकरण समारंभासाठी स्टेज आधीच तयार झाले होते. मोहसिन नक्वी आधीच त्यावर चढले आणि त्यानंतर 'टीम इंडिया' बक्षीस समारंभासाठी पोहोचला नाही. यामुळे सादरीकरण समारंभ सुमारे दीड तास थांबला. भारतीय खेळाडू जिंकल्यास नक्वी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारणार नाहीत अशी अटकळ अंतिम सामन्यापूर्वीच बांधली जात होती. नक्वी हे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आणि त्यांच्या देशाचे गृहमंत्री आहेत आणि भारतविरोधी भूमिकेसाठी ओळखले जातात. ते सध्या आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आहेत. 'एसीसी' अध्यक्ष म्हणून त्यांना विजयी संघाला ट्रॉफी सादर करणे आणि दोन्ही संघांशी हस्तांदोलन करणे बंधनकारक होते. तथापि, भारतीय संघाने पाकिस्तानमधील कोणाशीही हस्तांदोलन न करण्याचे आणि मैदानाबाहेर कोणत्याही संवादात सहभागी न होण्याचे धोरण स्वीकारले. खेळात हार-जीत होत असते. विजय हा संयमीपणे तर पराभव हा खिलाडूपणे स्वीकारायचा असतो; परंतु जगातील कोणत्याही देशाकडून झालेला पराभव पाकिस्तानला खुपतो. भारताकडून झालेला पराभव हा युद्धातील पराजयासारखा वाटत असतो. आशिया चषक स्पर्धेतील विजयानंतर पाकिस्तानी संघाचा कप्तान तसेच आशिया क्रिकेट संघटनेच्या अध्यक्षांचे वागणे विक्षिप्तपणाचे होते. चषक चोरून नेण्यापर्यंत एखाद्या देशाच्या नेत्याची मजल जात असेल, तर त्यात खिलाडूपणा नसून पराभवाचे शल्य जास्त आहे. आशिया चषकातील भारत- पाकिस्तान सामन्यानंतर या संघटनेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून चषक स्वीकारण्यास भारतीय खेळाडूंनी नकार दिल्यानंतर पाकिस्तानी क्रिकेट मंडळाच्या अध्यक्षांनी अपरिपक्वता दाखवली. चषक आणि पदके त्यांनी आपल्या हॉटेलच्या खोलीत नेली. आशिया क्रिकेट संघटनेने आता मोहसीन नक्वी यांना ट्रॉफी परत करण्यास सांगितले आहे. आशिया चषक सध्या दुबईच्या हॉटेलमध्ये आहे, जिथे नक्वी राहत आहेत. बीसीसीआय आता आशियायी क्रिकेट बोर्डाशी संबंधित ट्रॉफी भारतात परत आणण्यासाठी चर्चा करत आहे. 'बीसीसीआय'ने मोहसीन यांना शक्य तितक्या लवकर ट्रॉफी 'एसीसी' कार्यालयात परत करण्यास सांगितले आहे. कारण ती त्यांची वैयक्तिक मालमत्ता नाही. 'एसीसी' अधिकाऱ्यांनी नक्वी यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, बांगलादेशमध्ये होणारी एसीसी बैठक सुरुवातीला रद्द करण्यात आली होती. आता 'बीसीसीआय'ने ही बैठक पुढे ढकलण्यास सांगितले आहे. नक्वी यांनी केलेले कृत्य पाहता लवकरच ते 'एसीसी' प्रमुखपद गमावू शकतात. आशिया कपमध्ये भारताकडून सलग तिसऱ्या पराभवानंतर नक्वी यांना 'सोशल मीडिया'वर टीका आणि उपहासाचा सामना करावा लागला. आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात भारताकडून पराभव झाल्यानंतर पाकिस्तानी कर्णधार सलमान अली आघा याने एक वादग्रस्त विधान केले. आता तो स्वतःच्याच वक्तव्यात अडकलेला दिसतो. बीसीसीआय त्याच्यावर कारवाई करण्याचा विचार करत आहे आणि आयसीसीकडे तक्रार दाखल करू शकते. पाकिस्तानी कर्णधाराने दावा केला, की त्यांचा संघ त्यांचे सामना शुल्क भारतीय हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पाकिस्तानी सैनिकांच्या कुटुंबीयांना देईल. तसेच 'ऑपरेशन सिंदूर'मुळे झालेल्या नुकसानाची त्याने कबुली दिली. पाकिस्तानी कर्णधाराचे विधान केवळ वादग्रस्तच नाही, तर खेळाच्या पलीकडे असलेल्या मानवी मूल्याच्या संवेदनशील मुद्द्यालादेखील स्पर्श करते. हे उघड उघड आचारसंहितेचे उल्लंघन आहे. आता हा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर चिघळू शकतो. या संपूर्ण घटनांक्रमामुळे आशिया कपच्या रोमांचक अंतिम सामन्यात भारताने केलेला पराभव पाकिस्तानच्या किती जिव्हारी लागला, हे पहायला मिळत आहे.

# पर्यटनाची ओळख सातासमुद्रापार

अंतरा पारंगे

शांत, निसर्गरम्य समुद्रकिनारे, ऐतिहासिक किल्ले, नद्या, डोंगर, धार्मिक स्थळे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे प्रसन्न वातावरणामुळे रायगड पर्यटनासाठी लोकप्रिय बनला आहे. पर्यटनाचे आकर्षण कायमच मुंबई, पुण्यापासून देश, विदेशातील पर्यटकांना राहिले आहे. त्यामुळे जिल्ह्यात पर्यटकांची येणाऱ्याचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटनामुळे रायगडच्या अर्थव्यवस्थेलादेखील चांगली चालना मिळत आहे. अशातच रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, नागाव समुद्रकिनाऱ्यांना स्वच्छता, पर्यावरणस्नेही व्यवस्थापन आणि शाश्वत पर्यटनाच्या निकषांवर ब्लू फ्लॅग पायलट बीचचा बहुमान मिळाला आहे. रायगडच्या पर्यटनाला आंतरराष्ट्रीय ओळख प्राप्त झाली आहे. त्यामुळे पर्यटनाची ओळख सातासमुद्रापार गेली आहे.

ब्लू फ्लॅग म्हणजे सागरी किनाऱ्यांच्या पर्यावरणीय गुणवत्ता, पाण्याची स्वच्छता, सुरक्षा व स्वच्छता सुविधांवरील काटेकोर निकषांवर ब्लू फ्लॅग हा आंतरराष्ट्रीय दर्जा दिला जातो. जगभरातील ५० पेक्षा अधिक देशांत हा सन्मान मिळवलेले बीच पर्यावरणपूरक पर्यटनाचे आदर्श मानले जातात. यामध्ये भारतातील पाच किनाऱ्यांना हा ब्लू फ्लॅग दर्जा मिळाला असून रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व अलिबाग तालुक्यातील नागाव या दोन समुद्रकिनाऱ्यांचा समावेश आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नकाशावर कोकणातील सागरी पर्यटनाची एक नवी ओळख निर्माण झाली आहे.

रायगड हा विविध धर्म, बोलीभाषा आणि संस्कृतींच्या लोकांचा संगमस्थळ आहे. रायगड किल्ला, कुलाबा किल्ला, मुरुड-जंजिरा किल्ला आणि सुधागड किल्ला यांसारखे भक्कम किल्ले इतिहासाची साक्ष देतात. रायगडच्या ओळखीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे रायगड किल्ला आजही इतिहासाचा साक्षीदार आहे. आजही मराठ्यांचा गौरवशाली इतिहास रायगडवासीयांसाठी अभिमानाचा विषय आहे. इतिहासप्रेमी आणि पर्यटकांचे हे आवडते ठिकाण बनले आहे.

येथील पर्यटनाला चार चांद लावणारे येथील निसर्गरम्य समुद्रकिनारे. जे तुम्हाला निसर्गाचा, इतिहासाचा आणि शांततेचा मनमुराद आनंद देणारे ठरतात. नारळाच्या झाडांनी बहरलेले प्रसन्न समुद्र किनारे, मऊ, रेशमी वाळू, समुद्राच्या उसळणाऱ्या लाटांमुळे पर्यटक ओढले जातात. पर्यटनामुळे या परिसरात हॉटेल, खानावळ, चहा टपरी, पान टपरी, फळ व भाजी विक्रेते, रिक्षावाले या सर्व व्यावसायांना चालना मिळत आहे. जिल्ह्यात टयुरिस्ट गाईड तयार झाल्याने स्थानिक तरुणांना रोजगाराचे साधून उपलब्ध होत आहे. या तरुणांच्या मदतीनेत्या त्या परिसरातील पर्यटनाविषयी माहिती उपलब्ध होत आहे. अलिबागमधील समुद्रकिनारा हा तर प्रसिद्ध आहेच. अलिबागपासून साधारण ७ किमी अंतरावर, सुरूच्या झाडांनी व्यापलेला नागाव समुद्रकिनारा आहे. याठिकाणी पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. सुट्टीच्या दिवशी तर हा किनारा पर्यटकांनी फुलून जातो. नागाव समुद्रकिनाऱ्याच्या सभोवतालचे वनक्षेत्र अतिशय प्रसन्न असून येथील साहसी खेळांच्या सुविधेमुळे हा किनारा अधिकच लोकप्रिय होत आहे. पॅराग्लायडिंग, बनाना राईड, स्पीड बोट, हॉर्स कार्ट, हॉर्स रायडिंग येथे उपलब्ध असतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या राइड्स इतर शहरांसारख्या महागड्या नाहीत. त्यामुळे पर्यटकांना या खेळांचा आनंद घेता येतो.

नागावमध्ये लहान मोठे हॉटेल, रेस्टॉरन्ट असून कॉटेजेस आहेत. त्यामुळे घरगुती पध्दतीच्या भोजनाचा आनंद घेण्याची संधी यातून उपलब्ध होत आहे. नागावमध्ये पर्यटन वाढल्याने परिसरातील गावे, वाड्यांमध्ये राहणाऱ्या महिलांना रोजगाराचे साधन प्राप्त झाले. घरगुती भाकरी,बरोबरच सागरी मासळीची मेजवांनी खवय्यांना मिळत आहे. अलिबागपासून श्रीवर्धन शंभर किलो मीटरपेक्षा अधिक अंतरावर असलेले एक शहर आहे. श्रीवर्धनचा तीन किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा सुरक्षित किनाऱ्यांमध्ये गणला जातो. सुरूची बने, निरव शांतता यामुळे येथे प्रसन्न वाटते. सूर्यास्त बघण्यासाठी हे ठिकाण खूप छान आहे. पर्यटकांसाठी हे स्थळ पर्यटकांच्या फारच आवडते मानले जाते. श्रीवर्धन समुद्रकिनारी वेगवेगळ्या असलेल्या सुविधांमुळे या किनारी फिरण्याचा आनंद पर्यटक मनमुरादपणे घेतात. श्रीवर्धन आणि नागाव किनाऱ्यांचे ब्लू फ्लॅग इंडिया व पर्यावरण आणि हवामान बदल विभाग तसेच पर्यटन संचालनालय यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत मूल्यमापन करण्यात आले. राष्ट्रीय परीक्षक मंडळ व नॅशनल ऑपरेटर यांनी केलेल्या संयुक्त पाहणी, तांत्रिक तपासणीनंतर २०२५-२६ हंगामासाठी या किनाऱ्यांना पायलट स्टेटस मान्यता देण्यात आली आहे. श्रीवर्धन किनाऱ्याच्या विकासासाठी किनाऱ्यावरील वाळुक्षरण रोखण्यासाठी शास्त्रीय बौल्डर रचना आणि वृक्षसंवर्धनावर भर दिला जाणार आहे. तर नागाव किनाऱ्याच्या आराखड्यात प्रवेशद्वार, शौचालये, खाद्य विभाग, वाहनतळ, जलतरण सुरक्षित क्षेत्र अशी सुसज्ज सुविधा उभारण्याचे नियोजन आहे. दोन्ही किनाऱ्यांवर सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा वर्गीकरण, सुरक्षितता उपाययोजना आणि स्थानिक ग्रामपंचायतींच्या सहभागातून स्वच्छता मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या दोन्ही किनाऱ्यांना ब्लू फ्लॅग पायलट बीचचा बहुमान मिळाल्याने सागरी पर्यटनाची आणखी एक नवी ओळख मिळणार आहे.

लोकसंसद

## भेसळयुक्त मिठाई - लोकांच्या जीवाशी खेळ !

नोएडातील सेक्टर ११५ मधील एका मिठाई बनवणाऱ्या युनिटवर दिल्लीच्या अन्न सुरक्षा विभागाने हल्लीच छापा टाकून ११०० किलो भेसळयुक्त मिठाई जप्त करून ती जागेवरच नष्ट केली. याच विभागाने जीबी नगर परिसरात आणखी एका ठिकाणी छापा टाकून १८० किलो भेसळयुक्त मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थ जप्त केले. जयपूरच्या अन्न सुरक्षा विभागानेही अशाच एका कारवाईत ३५० किलो भेसळयुक्त मिठाई. ६५० किलो बनावट मिल्क केक आणि ५०० लिटर नकली दूध जप्त करून ते नष्ट केले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील अन्न आणि औषध प्रशासनाने ''सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा'' मोहिमेच्या अंतर्गत ३६ लाख रुपयांचा तब्बल ३० हजार किलो निकृष्ट आणि भेसळयुक्त अन्नसाठा जप्त केला. दूध, मिठाई, तूप, पनीर, फरसाण यांसारख्या पदार्थांचे नमुने तपासले असता अनेक ठिकाणी भेसळ आढळली. दिवाळी जवळ आली कि मिठाईत भेसळ करून ती चढ्या दारात विकणाऱ्यांचे सर्वत्र



पेव फुटते. या काळात सर्वत्र गोडधोडाचे वातावरण असल्याने घसा खवखवणे, खोकला सुरु होणे यांसारखे त्रास जाणवू लागले तरी ते मिठाईमुळे होत आहेत कि घरात बनवलेल्या तेलकट फराळामुळे ते कळत नाही. या दिवसांत प्रशासनाचा अन्न आणि औषध विभाग अलर्ट मोडवर असतो. कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या लोभाने ही भेसळयुक्त मिठाई बनवली जाते. भेसळयुक्त पेढे किंवा मिठाई खाल्यास घशात खवखव होते, खोकला येतो आणि पोटात दुखते. चक्कर येणे, पोटात मळमळणे , उलटी, जुलाब सुरु होणे यांसारखे परिणाम जाणवू लागतात. काविळसारख्या आजाराची लागण होऊ शकते. किडनी आणि यकृतावरही भेसळयुक्त मिठाईचा गंभीर परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही, तर विषबाधा अधिक झाल्यास खाणाऱ्याचा मृत्यूही ओढावू शकतो. भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास क्षयरोग होऊ शकतो. कृत्रिम दुधात युरियाची भेसळ असल्यास युरियातील नायट्रोजनमुळे मूत्रपिंड, यकृत आणि हृदय निकामी होऊ शकते. मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे दूध केमिकलयुक्त असल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत निष्पन्न झाल्यास भारतीय दंड विधान ३२८ कलमान्वये अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येतो. मिठाईसाठी वापरण्यात आलेल्या दुधात पाणी आणि दुधाची पावडर मिश्र केल्याचे आढळल्यास २६२ कलमान्वये गुन्हेगारास आर्थिक दंड ठोठावण्यात येतो. असे असूनही प्रतिवर्षी मिठाईत केल्या जाणाऱ्या भेसळीचे प्रमाण कमी न होता दरवर्षी त्यांमध्ये वाढच होत आहे. गणेशोत्सव आणि दिवाळीच्या काळात अनेक ठिकाणी भेसळयुक्त मिठाई सर्रासपणे विकली जाते. आर्थिक लाभासाठी पामतेलाचा वापर करून खवा बनवणे. कृत्रिम आणि केमिकलयुक्त दूध तयार करून त्यापासून मिठाई बनवणे यासारखे प्रकार सणासुदीच्या काळात प्रकर्षाने घडतात. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा महाभागांना खरेतर कठोर शिक्षा होणे अपेक्षित आहे; मात्र अनेकदा ही मंडळी कायद्यातील पळवाटांचा लाभ घेऊन निर्दोष सुटतात किंवा जामिनावर बाहेर पडतात. यांमध्ये कायद्याचे भय न राहिल्याने दरवर्षी भेसळयुक्त मिठाई बनवून विकणाऱ्यांमध्ये वाढच होताना दिसत आहे. यांच्यावर कायमस्वरूपी वचक बसण्यासाठी कठोर कायद्यासह जनमानसांत जागृती होणे नितांत गरजेचे आहे. लोकांच्या जीवाचे सोयरसुतक नसणाऱ्यांना खरेतर आता जनतेनेच धडा शिकवायला हवा !

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

दिनविशेष

# अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबालासोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

# बाराशे शिक्षकांची उपासमार

## ● चार महिन्यांपासून पगारच नाही

। पालघर । प्रतिनिधी ।

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिकवणाऱ्या १ हजार २०० कंत्राटी शिक्षकांची यंदाची दिवाळी काळी होण्याची शक्यता आहे. एकीकडे सर्वत्र खरेदीची लगबग सुरू झाली असताना पालघरमधील शिक्षकांना गेल्या चार महिन्यांपासून पगारच मिळालेला नाही. जून ते सप्टेंबरपर्यंतच्या पगाराची ९ कोटी ४० लाख रुपयांची रक्कम सरकारने थकवल्याने ऐन सणासुदीच्या काळात शिक्षकांवर उपासमारीचे संकट ओढवले आहे. मुलांची शिक्षणे, घरखर्च, आजारपण, कर्जाचे हप्ते यासाठी पैसे आणायचे तरी कुठून, असा प्रश्न पडला असून शिक्षण विभागाच्या या



बेफिकिरीविरोधात शिक्षक संतप्त झाले आहेत.

पालघर जिल्हा परिषदेच्या २ हजार २०० प्राथमिक शाळा असून तेथे कंत्राटी पद्धतीने शिक्षक नेमले आहेत. या शिक्षकांना दरमहा १६ ते २० हजार एवढे मानधन दिले जाते. पण तेदेखील वेळेवर मिळत नसल्याने आम्ही करायचे तरी काय, असा प्रश्न या शिक्षकांना पडला आहे. राज्य शासनाकडून याआधी १ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी आला होता. त्यातून केवळ मार्च महिन्याचा पगार शिक्षकांना दिला गेला. आता १ कोटी ६१ लाख इतका निधी मिळाला असला तरी तो जिल्हा कोषागारामध्ये पडून आहे. झेडपीकडे हा निधी वर्ग न झाल्याने शिक्षकांना त्याचा काहीच उपयोग होणार नाही.

पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता पडू नये म्हणून कंत्राटी तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. पण त्यांना वेळेवर पगार मिळत नसल्याने त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. अनेक शिक्षकांनी घरांसाठी तसेच मुलांच्या शिक्षणाकरिता बँकांकडून कर्ज घेतले आहे. त्याचे हप्ते कसे फेडायचे, असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झाला आहे. दिवाळी लवकरच सुरू होणार आहे. पण हातात पगारच नसल्याने मुलांना कपडे, फराळ व अन्य साहित्याची खरेदी करता येणार नाही. दिवाळीपूर्वी पगार द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### निधी मिळताच वाटप करणार

कंत्राटी तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांचे पगार चार महिन्यांपासून रखडले असल्याची कबुली पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी दिली आहे. ९ कोटी ४० लाखांचा निधी लवकरात लवकर मिळावा यासाठी सरकारकडे पत्रव्यवहार केला असून पैसे मिळताच शिक्षकांना पगाराचे वाटप करण्यात येईल, असे रानडे यांनी सांगितले.

# मराठी शाळांना लागणार टाळे

। मुंबई । प्रतिनिधी ।

'मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषा आणि शाळेला अत्यंत चांगले दिवस येणे अपेक्षित होते; परंतु राज्य शासनाने मराठी शाळांकडे केलेले दुर्लक्ष अत्यंत घातक टप्प्यावर पोहोचले आहे. यामुळे राज्यातील मराठी शाळांची वस्तुस्थिती लक्षात येण्यासाठी राज्य सरकारने तातडीने श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणी शालेय शिक्षण अभ्यास कृती समन्वय समितीचे निमंत्रक डॉ. दीपक पवार यांनी शनिवारी (दि. ११) केली.

मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत डॉ. पवार यांनी सरकारच्या धोरणावरच जोरदार टीका केली. राज्यभरामध्ये त्रिभाषा धोरणाला विरोध होत असताना सरकारने जाणीवपूर्वक डॉ. नरेंद्र जाधव समिती स्थापन केली; परंतु या समितीचा फार्स आणि मुंबई महापालिकेसारख्या यंत्रणेकडून



जाणीवपूर्वक मराठी अनुदानित शाळा बंद पाडण्याचे कारस्थान हा या व्यापक योजनेचाच भाग असल्याचा गंभीर आरोपदेखील त्यांनी केला.

मराठी शाळा वाचवायच्या असतील तर येत्या प्रत्येक निवडणुकीमध्ये सर्वच राजकीय पक्षांनी त्यांच्या जाहीरनाम्यात या मुद्द्यांचा समावेश केला पाहिजे आणि मराठी शाळा टिकवण्यासाठी तातडीने लोकलढा उभारला पाहिजे, अशी भूमिका शालेय शिक्षण अभ्यास आणि कृती समन्वय समितीच्या प्रतिनिधींनीकडून मांडण्यात आली. या पत्रकार परिषदेत मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत, शिक्षण-अभ्यासक आणि संस्थाचालक गिरीश सामंत, शिक्षण विकास मंचचे समन्वयक डॉ. माधव सूर्यवंशी, 'कायद्याने वागा लोकचळवळी'चे राज असरोंडकर, 'आम्ही शिक्षक सामाजिक संस्थे'चे सुशील शेजुळे यांनी आपली मते मांडली. मुंबई पब्लिक स्कूलच्या रूपाने या बदलाला राजमान्यता मिळवून देण्यात आली. आता हे लोण महाराष्ट्रातल्या तालुक्यांमध्ये पसरले आहे. अशीच परिस्थिती चालू राहिली तर येत्या दहा वर्षांत महाराष्ट्रातल्या अनुदानित शाळा नामशेष होण्याचा धोका आहे.

सीबीएसईकरण आणि आयसीएसईकरण तातडीने थांबवावे. तसेच इतर मंडळांच्या शाळा काढायच्या असतील तर त्या फक्त मराठी माध्यमाच्या काढाव्यात, अशी स्पष्ट भूमिका समितीने मांडली. वेळेसह पैशांचा अपव्ययमहाराष्ट्रामधून निःसंदिग्धपणे तिसऱ्या भाषेला विरोध झालेला असतानाही नरेंद्र जाधव समितीचा फार्स सुरू करून सरकारने जनतेचा वेळ आणि पैसा यांचा अपव्यय करत आहे. ही समिती अनावश्यक आहे, हे शालेय शिक्षण व कृती समन्वय समितीने या आधीही स्पष्ट केले आहे. तिसऱ्या भाषेच्या सक्तीचे शैक्षणिक, भाषावैज्ञानिक, मानसिक, सामाजिक-सांस्कृतिक परिणाम आणि त्यामागचा हिंदीचा देशांतर्गत वसाहतवाद व सांस्कृतिक राजकारण याबद्दलची समितीची भूमिका स्पष्ट करणारी पुस्तिका दिवाळीनंतर प्रसिद्ध केली जाणार आहे. या पुस्तिकेच्या प्रती राज्यातल्या सर्व लोकप्रतिनिधींना पाठवल्या जातील. तसेच ही पुस्तिका मराठी अभ्यास केंद्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल. हाच आमचा नरेंद्र जाधव समितीला प्रतिसाद आहे, असे समितीच्या प्रतिनिधींनी सांगितले. माहीम, शिवडी, कुर्ला, भांडुप या भागांतील १० शाळा बंद होण्याच्या मार्गावर शाळांच्या जमिनी विकण्याचा व त्यांचा व्यापारी उपयोग करण्याचा प्रयत्न स्ट्रक्चरल ऑडिटच्या नावाखाली शाळा पाडण्याचा डाव असल्याचा आरोपेही केला जात आहे.

### श्वेतपत्रिका जारी करा; कृती समितीची मागणी

### '...तर आम्ही एकमेकांना पाडणारच'

**मुंबई :** राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकासाठी सर्वच राजकीय पक्ष तयारी करत आहेत. मात्र अद्याप महायुतीतील पक्ष एकत्र निवडणूक लढवणार की स्वतंत्र लढवणार याबाबत माहिती समोर आलेली नाही. स्थानिक पातळीवरील समीकरणे लक्षात घेता भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी हे पक्ष एकत्र निवडणूक लढवण्याची शक्यता कमी आहे. अशातच आता भाजपचे नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी मित्रपक्षांना इशारा दिला आहे. जळगावमध्ये बोलताना स्थानिक स्वराज्य संस्थेतील युतीबाबत बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, 'युती नाही झाली तर आपण एकमेकांना निवडून आणण्यासाठी थोडंच उभ राहणार आहोत. मैत्रीपूर्ण लढती झाल्या तरी आम्ही एकमेकांना पाडणारच आहोत.

# न.प. निवडणुकीत घरभेद्यांकडूनच धोका?

। माथेरान । प्रतिनिधी ।

नेहमीच थंड असणारे माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीचे आरक्षण जाहीर झाल्यापासून राजकीय द्वेषाच्या ज्वाळा उफाळून येण्यास सुरुवात झाली असून, राजकीय वातावरण काहीअंशी तापलेले दिसत आहे. अल्प मताधिक्य असणाऱ्या काही पक्षांच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांनी अगोदरच नांगी टाकलेली दिसत असून, राज्यात जरी ठराविक पक्षांच्या युत्या आघाड्या असल्या तरीसुद्धा इथे स्थानिक पातळीवर गावाच्या विकासाचे हित न पाहता स्वतःच्या स्वार्थासाठी तुल्यबळ पक्षाच्या मागे खंबीरपणे जायचे असाच जणूकाही ठराव केल्याचे एकंदरीत परिस्थितीवरून स्पष्ट होत आहे.

त्यातच मिनी विधानसभा निवडणूक म्हणून नगरपरिषदेच्या आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीकडे पाहिले जात असून, काहीही करून आपण कुणाच्याही पालखीत बसून नगरपरिषदेच्या सभागृहात आसनस्थ व्हायचे, अशीच खूणगाठ बांधल्याचे काही अल्प मताधिक्य असणाऱ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या देहबोलीवरून स्पष्टपणे दिसून येत आहे. परंतु काही तुल्यबळ पक्षाच्या अंतर्गत कलहामुळे केवळ खुर्चीसाठी रस्सीखेच सुरू आहे. राजकारणात सर्व नीतीमत्ता आणि स्वाभिमानाला तिलांजली देऊन सोयीचे राजकारण सुरू झाले आहे. तर काही लबाड कार्यकर्त्यांच्या खोट्या भूलथापांना आणि स्तुत्यांनी भारावून गेलेले काही नेते नाहक स्वतःचा राजकीय कडेलोट झालेला स्वतःच अनुभवण्याची दाट शक्यता आहे. ढोंगी कार्यकर्त्यांची यावेळी निश्चितच कोंडी होणार असून, त्यांनी आर्थिक हव्यासापोटी आखलेले मनसुबे धुळीस मिळणार असल्याचेही बोलले जात आहे.

एकूण वीस उमेदवारांना यावेळी सभागृहात विराजमान होण्याची नामी संधी मिळणार आहे. परंतु, इच्छुकांना जर का उमेदवारी मिळाली नाही, तर क्रॉस वोटिंग करून स्वतःच्या पक्षाच्या उमेदवाराला पराभवाची धूळ चारण्यासाठी धूर्त कार्यकर्ते मागेपुढे पाहणार नाहीत, अशीही परिस्थिती येत्या निवडणुकीत नागरिकांना पहावयास मिळणार आहे. त्यामुळे ज्या ज्या पक्षांच्या वरिष्ठांनी आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात येणार आहे, त्यांनी आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना अगोदरच सूचना करणे गरजेचे आहे अन्यथा कार्यक्षम उमेदवार यावेळी सभागृहात दिसणार नाहीत.

# आता महिनाभरात होणार जमीन मोजणी

## महसूल विभागाचा मोठा निर्णय

। मुंबई । प्रतिनिधी ।

शहरी व ग्रामीण भागात जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होत असतात. यासाठी जमिनीची मोजणी होणे आवश्यक आहे. सध्या या कामासाठी अर्ज केल्यावर ९० ते १२० दिवसांचा कालावधी लागतो. हे लक्षात घेता जमीन मोजणी प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी राज्यात परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. यामुळे अर्ज केल्यावर आता ३० दिवसांत जमीन मोजणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

जमीन मोजणीसंदर्भात महसूल विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'एक्स' पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली आहे.

नागरिकांच्या पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेत, गुंठेवारी, संयुक्त भूसंपादन मोजणी, वन हक्क दावे मोजणी, नगर भूमापन मोजणी, गावठाण भूमापन मोजणी व सीमांकन तसेच मालकी हक्कासाठी जमीन मोजणी प्रक्रिया अत्यावश्यक असते. या मोजणी प्रकरणांचा ३० दिवसांत निपटारा करण्यासाठी सरकारकडून परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे.

### साडेतीन कोटी प्रकरणे प्रलंबित

राज्यात मोठ्या प्रमाणावर खरेदी खत होतात. पोटहिस्से होतात. गुंठेवारी कायद्यानं घरं कायदेशीर होतात. जवळपास साडेतीन कोटी प्रकरणे प्रलंबित आहे. रोज २५ ते ३० हजार अर्ज मोजणीसाठी येतात, असे बावनकुळे म्हणाले. जमीन मोजणीसाठी खासगी भूमापक आणल्याने मोजणीचा अर्ज मिळाल्यानंतर ३० दिवसांत मोजणीचं प्रमाणपत्र मिळेल. खासगी भूमापक यांना शासनाच्या रोवर दिला जाईल. त्यानंतर सिटी सर्वेअर रोवर मॅच करून प्रमाणपत्र देतील.

### 'कृषीमंत्री नुसता शेपूट हलवणार नको'


**मुंबई :** कृषीमंत्री नुसता शेपूट हलवणारा नकोय आम्हाला, मागे माणिकराव कोकाटे कृषीमंत्री होते. ते ओबडधोबड बोलत होते. ते घरी गेले. भरणे थोडे बरे बोलतात, कमीत कमी ते चुका तरी करत नाहीत. मात्र, शेपूट हलवणं बंद केलं पाहिजे, असं म्हणत बच्चू कडे यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर निशाणा लगावला. तुम्ही कृषीमंत्री आहात.. सबसे ज्यादा भार तुम्हारी तरफ है... सर्वात जास्त संख्या शेतकऱ्यांची आहे, असंही कडू यावेळी म्हणाले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१३ ऑक्टोबर**

१) श्री. प्रकाश नारायण म्हात्रे
चेंढरे, अलिबाग
१३-१०-१९४९
२) श्री. अशोक गणपत पाटील
वेश्वी, अलिबाग
१३-१०-१९४६
३) श्री. जयंत गणपत विरकुड
अलिबाग
१३-१०-१०५६
४) श्री. शिवाजी सोपान वाघमोडे
चेंढरे, अलिबाग
१३-१०-१९५८

### सुवर्णकण



शुद्ध आचार विचार असल्याशिवाय उत्तम गती मिळणारच नाही.

सद्गुरु नी दाखवलेल्या पायवाटेने विवेक तीर्थावर जाऊन, यमनियमानी शरीरशुद्धी साधलीच पाहिजे. असा भगवान श्री ज्ञानदेवांचा आग्रह आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

### साडेबारा कोटींचे सोने जप्त

। मुंबई । प्रतिनिधी ।

ऑपरेशन गोल्डन स्वीप अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर तेरा जणांना महसूल गुप्तचर संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. त्यात सहा श्रीलंकन, दोन बांगलादेशी, विमानतळावरील दोन कर्मचारी, दोन हॅण्डलर आणि मुख्य आरोपीचा समावेश आहे. त्यांच्याकडून या अधिकाऱ्यांनी तब्बल १२ कोटी ५८ लाख रुपयांचे १० किलो ४४८ ग्रॅम वजनाचे सोने जप्त केले आहे. संतोष विनोद कनोजिया, राहुल सुभाष जाधव, मोहम्मद रिमशान मोहम्मद रफिक, अनिल गुरुशांत अरमान, मोहम्मद कमाल हुसैन, मोहम्मद साजिथ मोहम्मद शालिहीन, महफुज आलम, मोहम्मद रशीद मोहम्मद निजार, मोहम्मद इफ्तिकार मोहम्मद जौफर, सैनूल इनाफ सैनूल इब्राहिम, मोहीदीन रिझलान सराफुल अनाम अशी या प्रवाशांसह कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

### 'हुंडा घेणारे समाजातील नामर्द'

। अकोला । प्रतिनिधी ।

हुंडा घेणारे नामर्द असल्याचं परखड मत मराठी चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी व्यक्त केलं. स्त्री जर टिकली नाही तर, समाज कसा टिकेल? असा सवाल त्यांनी यावेळी केलाय. ते रविवारी अकोला जिल्ह्यातील बाळापुर तालुक्यातल्या निंबा फाटा येथे एका सभेत बोलत होते. निंबा फाटा येथे अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या वतीने कुणबी स्नेहमिलन सोहळा आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला अभिनेते मकरंद अनासपुरे आणि अभिनेत्री गिरिजा ओक उपस्थित होत्या. मराठी चित्रपट सृष्टीतील संवेदनशील अभिनेते म्हणून अनासपुरे यांची ओळख आहे.

## निवडक

### राज्याचे अर्थमंत्री दहावी पास

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात चाललंय काय ते कळत नाही. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जे या राज्याचे गृहमंत्री आहेत ते निलेश घायवळसारख्या व्यक्तीला वाचवत आहेत हे खरोखर दुर्दैवी आहे अशी टीका सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली. तसंच आपल्या राज्याचे अर्थमंत्री दहावी पास आहेत त्यांना अर्थकारण खरंच कळतं का? असा सवालही आज अंजली दमानियांनी विचारला.

**अजंली दमानियांची अजितदादांवर टीका**

राजकारणात काय चाललं आहे तेच कळत नाही. आज जो पक्ष एका पक्षाबरोबर आहे तो दुसऱ्याबरोबर जातो आणि पहिल्यावर टीका करायला लागतो. घायवळ प्रकरणात देवेंद्र फडणवीस म्हणतात की आम्ही पासपोर्टची संमती दिली नव्हती. हे सगळं जे काही चाललं आहे ते किळसवाण्या पद्धतीने होतं आहे असं सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे. तसंच त्यांनी अजित पवार यांच्यावरही पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री हे दहावी पास आहेत. त्यांच्या शिक्षणावर मला टीका करायची नाही. पण अर्थकारण त्यांना खरंच कळतं का यासाठी मी हे उदाहरण दिलं. महाराष्ट्र हा स्वित्झर्लंड इतका मोठा आहे. पण तो एक देश आहे आणि आपला महाराष्ट्र हे आपलं राज्य आहे. महाराष्ट्रावर सध्या नऊ लाख कोटींचं कर्ज आहे. हे पैसे कुठून आणणार यावर कुणीही चर्चा करत नाही.

### वरिष्ठ आयपीएस अधिकारी पुरन कुमार आत्महत्या प्रकरण

**मुंबई :** हरियाणामध्ये वरिष्ठ आयपीएस अधिकारी पुरन कुमार यांनी सवर्ण वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून झालेल्या जातीय छळाला कंटाळून आत्महत्या केली, या घटनेने प्रशासनातील जातीय मानसिकतेचा चेहरा पुन्हा एकदा उघड केला आहे.या घटनेवर प्रतिक्रिया देताना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "हा संदेश आहे इथल्या मागासवर्गीय आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांना की, आपल्याकडे आर्थिक सुबत्ता आली म्हणून आपल्याला कोणी हाथ लावू शकत नाही, हा फुगा आता फुटला आहे. आता या जातीयवादाच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागेल.''ते पुढे म्हणाले की, "पूर्वी ग्रामीण भागात मागासवर्गीयांवर खुलेआम जातीय अत्याचार होत होते; पण आता तेच अत्याचार प्रशासनातील उच्च पदांवर असलेल्या अधिकाऱ्यांवर होऊ लागले आहेत. ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.'' या घटनेमुळे प्रशासनातील दलित व मागासवर्गीय अधिकाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सामाजिक न्याय व समानतेच्या नावाखाली चालणाऱ्या व्यवस्थेतील दुटप्पीपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी हा धोका मांडला आहे.



### अरिशा शेखचे उल्लेखनीय यश

**कर्जत :** कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थीनी कु. अरिशा मुख्तार शेख हिने २०२५ मध्ये इंट्रा-कॉलेज, इंटर-कॉलेज राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अरिशाने २५ हून अधिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून, त्यापैकी अनेक ठिकाणी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाचे नाव उंचावले. अरिशाने राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन आर्टिकल प्रेझेंटेशन, रील मेकिंग, ई-पोस्टर सादरीकरण, स्लोगन व लोगो मेकिंग, ऑनलाइन क्विझ तसेच विविध इंट्रा आणि इंटर-कॉलेज स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. या स्पर्धा डॉ. जे. जे. मागदूम ट्रस्टचे अनिल ॲलियस पिंटू मागदूम मेमोरियल फार्मसी कॉलेज, पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, एमव्हीपी कॉलेज ऑफ फार्मसी नाशिक इत्यादी नामांकित संस्थांमध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या. सुधाकरराव नाईक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पुसद महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय लोगो मेकिंग स्पर्धेत प्रथम, राज्यस्तरीय जिजामाता कॉलेज ऑफ फार्मसी, सराटी, पुणे महाविद्यालयात आयोजित ई-पोस्टर सादरीकरण स्पर्धेमध्ये प्रथम, यादवराव तासगावकर फार्मसी महाविद्यालयात आयोजित रील मेकिंग स्पर्धेमध्ये द्वितीय, ईश्वर देशमुख इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी दिग्रस महाविद्यालयात आयोजित टेस्टिमोनियल स्पर्धेत व्ही.जे.एस.एम. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, अले राज्यस्तरीय ई-प्रश्नमंजुषा स्पर्धेत उल्लेखनीय पारितोषिक तसेच कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात आयोजित प्रश्नमंजुषा व ऑफलाइन पोस्टर सादरीकरण यामध्ये तृतीय क्रमांक पटकवला.

### इन्शुरन्स कंपनीकडून रुग्णाची फसवणूक

**चिरनेर :** ब्रेन स्ट्रोकचा झटका आलेल्या प्रफुल्ल जगन्नाथ केणी यांना स्टार हेल्थ अँड अललीड इन्शुरन्स कंपनीकडून मिळणारी आरोग्य विमा संरक्षणाची रक्कम तसेच वैद्यकीय देयकाची देण्यात येणारी रक्कम न दिल्यामुळे कंपनीने त्यांची फसवणूक केल्याचा आरोप त्यानी कंपनीला दिलेल्या लेखी निवेदनातून केला आहे. मोठभोम येथील प्रफुल्ल जगन्नाथ केणी यांनी स्टार हेल्थ अँड अललीड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड व्यवस्थापनाचे पाणदिवे येथील प्रतिनिधी नितीन ठाकूर यांच्याकडे २४ नोव्हेंबर २०१५ रोजी ग्राहक कोड ४७५०७८९ व आरोग्य संरक्षण पत्र क्रमांक ११२४०६३४६५९३०८ अन्वये आरोग्य संरक्षण विमा करार स्वीकारला होता. मात्र, प्रफुल्ल केणी यांना अचानक आलेल्या ब्रेन स्ट्रोकच्या झटक्यामुळे त्यांना हॉस्पिटलचा मोठा खर्च आला होता. या घटनेला नऊ महिने उलटून गेले आहेत. परंतु अजूनही कंपनीने आरोग्य विमा संरक्षणाची रक्कम तसेच वैद्यकीय देयकाची रक्कम प्रफुल्ल केणी यांना न दिल्यामुळे कंपनीने त्यांची अक्षरशः फसवणूकच केली असल्याचा आरोप प्रफुल्ल केणी यांच्या कुटुंबियांनी केला असून, कंपनीच्या नाकामी गलथान कारभाराविरोधात प्रफुल्ल केणी यांच्या कुटुंबियांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. याबाबत वृत्त असे की, उरण तालुक्यात मोठेभोम येथे राहत असलेल्या प्रफुल्ल जगन्नाथ केणी यांना १६ सप्टेंबर २०२४ रोजी ५ वाजून १५ मिनिटांनी ब्रेन स्टॉकचा झटका आला होता. त्यामुळे त्यांना तातडीने पनवेल येथील गांधी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान वैद्यकीय खर्चाच्या रकमेची तरतूद ही प्रफुल्ल केणी यांनाच करावी लागली होती. त्यानंतर व्यवस्थापनाला आरोग्य संरक्षण विमा संबंधी अर्ज केल्यानंतर दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी कंपनीच्या व्यवस्थापनाकडून फक्त ४० हजार रुपयांची रक्कम गांधी हॉस्पिटलला प्राप्त झाली होती. यात २१ सप्टेंबर २०२४ या सहा दिवसांच्या वैद्यकीय उपचारानंतर प्रफुल्ल केणी यांना घरी पाठविण्यात आले. या उपचारदरम्यान प्रफुल्ल केणी यांना १४३१८८ एवढ्या रुपयांचा हॉस्पिटलचा खर्च आला होता.

### हरविलेल्या महिलेच्या कुटुंबियांचा लावला शोध | स्वखर्चातून तिच्यावर केले वैद्यकीय उपचार

# नागोठणे महिला पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

। नागोठणे,। प्रतिनिधी ।

आजच्या जगात माणुसकी दुर्मिळ झाली आहे असे बोलले जाते. मात्र आजही माणुसकीचा झरा जिवंत असल्याची कौतुकास्पद कामगिरी नागोठणे पोलीस ठाण्यातील दामिनी पथकातील तीन महिला पोलीस हवालदार व दोन पोलीस कर्मचाऱ्यांनी केली आहे. नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिसांनी केलेल्या या कौतुकास्पद कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



■ (छायाचित्र : महेश पवार)

यासंदर्भात नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत बाजारपेठ येथे एक महिला मानसिक संतुलन बिघडलेल्या अवस्थेत एकटीच फिरताना दिसून आली. बाजारपेठ येथील नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे दामिनी पथकाच्या म.पो. हवा. सरोजिनी सावंत, म.पो. हवा. प्रीती ओमले, म.पो. हवा. मोनिका शेरामकर यांनी त्या महिलेला ताब्यात घेतले. नंतर तिला जेवण देऊन वैद्यकीय मदत करून तिला शांत करून नागोठणे पोलीस ठाण्यात आणले.

या महिलेकडे सखोल चौकशी केली असता तिची आई जयश्री बाळासाहेब थोबडे यांचा मोबाईल नंबर तिने पोलिसांना दिल्यानंतर त्यावर व्हिडिओ कॉल केला असता त्यांनी सदर महिलेला ओळखून ती महिला त्यांचीच मुलगी प्रियांका बाळासाहेब थोबडे, वय ४० वर्ष, रा. शाहीर वस्ती, तुळजापूर वेस, सोलापूर येथील असल्याचे तसेच तिचे मानसिक संतुलन बिघडले असल्याचे तिच्या आईने सांगितले.

पोलिसांनी महिलेच्या आईकडून त्यांचा राहता पत्ता घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, पो.ह. अथर्व पाटील, म.पो. हवा. सरोजिनी सावंत, म.पो. हवा. प्रीती ओमले, चालक पो. शि. मिलिंद महाडिक आदींचे पोलीस पथक तात्काळ सोलापूर येथील सांगितलेल्या ठिकाणी रवाना होऊन शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास नागोठण्यात सापडलेल्या महिलेला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आली. नागोठणे पोलिसांच्या या जलदगती कारवाईचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# भात कापणीला सुरुवात

## •अनेक हातांना काम मिळाले



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील भात पिक कापणी योग्य तयार झाले असून कापणीला सुरुवात झाली आहे. या कापणीतून हजारो हातांनाआता महिनाभर काम मिळणार आहे. विशेष म्हणजे आदीवासी वाड्यांमधील महिला व पुरुषांना रोजगाराचे दालन खुले झाले आहे.

वाढत्या औद्योगिकीरणासह उत्पादन कमी येत असल्याने भात शेतीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस भात पिकांचे क्षेत्र कमी होऊ लागले आहे. खर्च अधिक आणि उत्पन्न कमी या नकारात्मक विचारामुळेअनेकांनीशेतीकरण्याकडे दुर्लक्ष करून मुंबई, पुणेकडे नोकरी करण्यावर भर दिला आहे. तर, काही ठिकाणी औद्योगिकीकरणामुळे जमीन संपादन प्रक्रीया वाढू लागली आहे. अनेकांच्या पिकत्या जमीनी प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आल्या असून काही ठिकाणी त्या घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतीचे क्षेत्र घटले आहे. दहा वर्षांपुर्वी १ लाख २४ हजार हेक्टर क्षेत्र होते. मात्र, दोन वर्षांपूर्वी हेच क्षेत्र ९४ हजार हेक्टर इतके होते. यावर्षी या क्षेत्रात १० हजार हेक्टरने घट झाली आहे. त्यामुळे यावर्षी जिल्ह्यामध्ये ८४ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये भात पिकांची लागवड करण्यात आली होती. त्यात कोलम, सुवर्णा, रत्ना अशा अनेक पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले.

आता पावसाचा हंगाम संपला असून भात शेती बहरू लागली आहे. कापणीयोग्य पिक झाल्याने शेतकऱ्यांनी गेल्या चार दिवसांपासून कापणीला सुरुवात केली आहे. दुपारी ऊन लागत असल्याने पहाटेपासूनच भात कापणीला सुरुवात केली जात आहे. शेतकरी कापणीच्या कामाला लागला आहे. दिवाळीपुर्वी ३० टक्केहून अधिक क्षेत्रातील भात कापणी पूर्ण होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या भात कापणीतून ग्रामीण भागातील विशेष म्हणजे आदीवासीवाड्यांमधील महिला व पुरुषांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. ३०० रुपयांपासून कामगारांना मजुरी दिली जात आहे. महिनाभर ही प्रक्रीया सुरु राहणार असल्याने अनेकांच्या हाताला काम मिळणार आहे.

# आज आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदीती तटकरे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अलिबागमधील कुरुळ येथील आरसीएफ वसाहतीच्या सभागृहात सोमवारी (दि.१३) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास होणार आहे. कर्तृत्ववान शिक्षकांचा हा सोहळा असणार आहे. यावेळी जिल्ह्यातील १२० शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी खासदार धैर्यशील पाटील, सुनील तटकरे, श्रीरंग बारणे, विधान परिषद आमदार निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर, रविंद्र पाटील, महेंद्र थोरवे, महेश बालदी तसेच जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे यांची विशेष उपस्थिती असणार असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

## ज्येष्ठ नागरिक संघांच्या कार्यकारिणीची निवड

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

गोरगाव परिसरातील ज्येष्ठ नागरिक संघ संस्थेची मासिक सभा नुकतीच संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर यांच्या उपस्थितीत तीन वर्षांकरिता नविन पदाधिकारी व कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. त्यात अध्यक्ष नरेश सुर्वे, उपाध्यक्ष सत्यजित डांगे, सचिव विलास मयेकर, खजिनदार महादेव गोरेगावकर, सहसचिव विमल दांडेकर, सदस्य हरिश्चंद्र शहा, दशरथ खाजणे, धनंजय करंबे, विजयालक्ष्मी गोविलकर, सीमा भुस्कुटे, राजश्री सुर्वे, सल्लागार सुरेश पालकर, सुभाष गायकवाड व रमेश गोविलकर यांची निवड करण्यात आली.

### जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक अलका शांताराम पाटील, वगैरे यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| पवेळे ता.अलिबाग जि. रायगड | १४/१/फ/४अ/१२ | ०-४४-८० पो.ख. ०-०८-९० एकूण ०-५३-७० | ७.८९ |

या मिळकतीपैकी ०-३५-०० हे. आर. (३५ गुंठे) इतके क्षेत्र खरेदी-विक्री करण्याच्या बाबतीत सदरच्या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ११/१०/२०२५

सही
**ॲड. ज्योती आर्केश पाटील**
रा. २०४, कृष्ण मंदिर, मारूती नाका,
अलिबाग बीच रोड, जि. रायगड
मोबाईल नं. ९४२०६५१७३३



## शास्ती माफीसाठी मुदतवाढीची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्यसरकारने शहरातील नागरिकांच्या शास्तीसाठी अभय योजना जाहीर केली आहे. राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील थकीत घरपट्टीवरील शास्ती माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्या शास्ती माफीसाठी शासनाने देण्यात आलेली मुदत संपत आली आहे. त्यामुळे शासनाने शास्ती माफीचे अर्ज करण्यासाठी मुदत वाढवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे. कर्जत नगरपरिषदेने शास्ती माफीचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १० ऑक्टोबर निश्चित केली होती. मात्र, अनेक मालमत्ता धारक नोकरी, व्यवसायामुळे बाहेरगावी स्थायिक असल्याने तसेच नवरात्र-दसरा सणामुळे नागरिकांना अर्ज सादर करण्यात अडचणी आल्या. त्या पार्श्वभूमीवर कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना अर्ज स्वीकृतीची मुदत आणखी १५ दिवसांनी वाढवावी, अशी मागणी करणारे निवेदन सादर करण्यात आले.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मौजे आमणोरी ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. तुषार गणेश कानडे | ३३/९ | ०-१०-०० | ०-०६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १३/१०/२०२५

खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

**ई-निविदा सूचना क्रमांक ४५/२०२५-२०२६(मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामाकरिता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती... सन २०२५-२०२६ साठी ईपीडीएम सीलींग कंपाऊंड वापरुन ऑनलाईन सीलींग पद्धतीने एफ्लुएंट डिस्पोजल योजनेच्या खराब झालेल्या एचडीपीई व पीएससी सांडपाणी वाहिनीच्या जॉइंट्सची गळती रोखणे. | रु.३५,४७,१३०.०० |
| २ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती...पाताळगंगा येथील जुन्या जलशुद्धीकरण केंद्रातील ड्रेन कलेक्शन टँकवरील स्लूस गेट बदलणे. | रु.३३,३९,२००.०० |
| ३ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... रानसई जलशुद्धीकरण केंद्र ते ओएनजीसी पर्यंतच्या उर्ध्व पाणीपुरवठा जलवाहिनीची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.३०,७६,८०७.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती.. महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.३९,७९,०९६.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १४-१०-२०२५ ते दिनांक २८-१०-२०२५ पर्यंत http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांकरीता दिनांक १५-१०-२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक १७-१०-२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होतील.

### जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री.प्रदीप महादेव पाटील यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| कार्ले ता.अलिबाग जि. रायगड | ७९ | ०-४३-५० पो.ख. ०-०६-१० एकूण ०-४९-६० | ११.२८ |

या मिळकतीपैकी ०-४९-६० हे. आर. या मिळकत क्षेत्रापैकी श्री. प्रदीप महादेव पाटील यांच्या नावे असलेले ०-२७-६० इतके क्षेत्राचा खरेदी-विक्री करण्याच्या बाबतीत सदरच्या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ११/१०/२०२५

सही
**ॲड. ज्योती आर्केश पाटील**
रा. २०४, कृष्ण मंदिर, मारूती नाका,
अलिबाग बीच रोड, जि. रायगड
मोबाईल नं. ९४२०६५१७३३

### जाहीर नोटीस

दि : १३/१०/२०२५

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे डिकसळ आणि चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकतींचे मालक/भोगवटादार महताब लईक अहमद शेख उर्फ महताब लईक शेख यांच्या खुद्द मालकीच्या मिळकती असुन आम्ही सदर मिळकतींच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| अ. क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १. | १४/२०/अ | ०-३८.०० | ०.११ |
| २. | १४/२०/ब | ०-०७.०० | ०.०३ |

**मौजे चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| अ.क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३. | १७/१०/अ | ३-४९.०० | २.३५ |
| ४. | १७/११ | १-००.०० | ०.७० |
| ५. | १७/१५/अ | ०-३१.०० | ०.३० |
| ६. | १७/१५/ब | ०-४१.०० | ०.३१ |
| ७. | १७/१६/ब | ०-९७.०० | ०.६७ |
| ८. | १७/१६/क | ०-४०.०० | ०.२८ |

त्याअर्थी विद्यमान मालकाव्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालील प्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील महताब लईक अहमद शेख उर्फ महताब लईक शेख यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून मालकी हक्काचे प्रमाणपत्र (Title Certificate) देण्यांत येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १३-१०-२०२५

श्री. तुषार द.देवरे, ॲडव्होकेट
पत्ता :- फ्लॅट नं. ए-२, जय नगर को. ऑप हौ.सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com



## ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

। उरण । प्रतिनिधी ।

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी शेतमजुरांच्या आत्महत्या वाढत आहेत. आतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी, शेतमजुर, ग्रामीण कामगार व कर्मचारी हवालदील झाले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या सुद्धा केली आहे. त्यामुळे श्रमिकांमध्ये सरकारच्या विरोधात तीव्र असंतोष खदखदत आहे. तरी, या शेतकऱ्यांना सरकारने मदत करावी यासाठी संपूर्ण राज्यभर अखिल भारतीय किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन व अखिल भारतीय शेत मजूर युनियनच्यावतीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये आंदोलने व निदर्शने करण्याचा निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने राज्यात ओला दुष्काळ लागू करा, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करा व नुकसानीची रास्त भरपाई द्या, या मागणींसाठी निदर्शने करत राज्याचे मुख्यमंत्री, कोकण आयुक्त व उरण तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी अखिल भारतीय किसान सभा राज्य कोषाध्यक्ष तथा जिल्हा सेक्रेटरी कॉम्रेड संजय ठाकूर, किसान सभा जिल्हा कोषाध्यक्ष रविंद्र कासुकर, पद्माकर पाटील, देवीदास म्हात्रे, चंद्रकांत कोळी, सी.आय.टी.यू.चे राज्य सेक्रेटरी कॉम्रेड भूषण पाटील, जिल्हा खजिनदार सतिष खरात, राजेंद्र फडतरे, जनवादी महिला संघटनेच्या राज्य उपाध्यक्षा हेमलता पाटील, रजनी पाटील, ललिता पाटील, गीता म्हात्रे, लता पाटील, निराताई घरत, लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेचे नेते जयवंत तांडेल, अनंत ठाकूर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(९), सहित महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२(७) अन्वये)**

**प्रारंभिक नगर रचना परियोजना नैना क्र. ९**

**(बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग) तालुका पनवेल, जिल्हा रायगड)**

ज्याअर्थी, प्रारुप नगर रचना परियोजना नैना क्र. ९, (बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८१७ /९७३/सीआर-१०३/१७/यूडी-१३, दि. १३ सप्टेंबर २०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ६८च्या पोटकलम (२) अन्वये त्यांची अधिसूचना क्र. सिडको/नैना/टीपीएस-९/२०२४/२०१ दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-२ मध्ये दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने श्री. अभिराज गिरकर, निवृत्त सह संचालक, नगर रचना यांची नेमणूक उक्त अधिनियमांच्या पोटकलम (१) कलम ७२ प्रमाणे उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी लवाद म्हणून अधिसूचना क्र. टीपीएस-१२२४/८२१/प्र.क्र. ५८/२४/नवि -१२ दिनांक १२ जुलै २०२४ केली आहे व सदर अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्र कोकण विभाग पुरवणी मध्ये दि. ८-१४ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्या अर्थी महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ (१) अन्वये दि. ०५ सप्टेंबर २०२४ रोजी सुचना प्रसिद्ध करुन नगर रचना परियोजना नैना क्र. ९, (बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड) करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दि. ०५ सप्टेंबर २०२४ पासून सुरु करण्यात आले आहे.

आणि ज्या अर्थी विहीत केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगर रचना परीयोजनेमध्ये समाविष्ठ झालेल्या सर्व जमीन मालकांना देण्यात आलेल्या असून त्यांची या संदर्भातील सुनावणी पूर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत.

आणि ज्या अर्थी नगर रचना परियोजना नैना क्र. ९, (बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड) हीची उक्त अधिनियमांच्या पोटकलम (३) कलम ७२ नुसार दि. २९ एप्रिल २०२५ रोजी नोटीस क्र. लवाद/न.र.यो.- ९/ सर्वसाधारण/२०२५/७३८ अन्वये प्रारंभिक योजना व अंतिम योजना अशी उपविभागणी करण्यात आलेली आहे.

आणि ज्या अर्थी उक्त नियमांमधील नियम क्र.१३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करुन उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (४) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत.

त्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार नगर रचना परियोजना नैना क्र. ९, (बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड) या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (७) प्रमाणे तसेच उक्त नियमांचा नियम क्र. १३(९) प्रमाणे ही परियोजना दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी तयार करण्यात आली आहे असे जाहीर करीत आहेत.

ही प्राथमिक परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्या कडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परीयोजनेत समाविष्ट झालेल्या जमीनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई ४००६१४ येथे प्रसिध्द करण्यात आली आहे.

**दिनांक :** १८ सप्टेंबर, २०२५
**पत्ता :** नैना कार्यालय, टॉवर नं. १०, आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर-नवी मुंबई ४००६१४

**अभिराज गिरकर**
**नगर रचना परियोजना, नैना क्र. ९,**
**(बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग))**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२९४/२०२५-२६

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### सार्वजनिक सूचना

याची नोंद घ्यावी कि, आम्ही आमच्या अशिलांच्या वतीने **बिदुर प्रोजेक्ट रिअल्टी वन एलएलपी**, मर्यादित दायित्व भागिदारी अधिनियम, २००८ अन्वये स्थापन झालेली आणि नोंदणीकृत असलेली एक मर्यादित दायित्व भागिदारी पेढी, जिचा एलएलपी परिचय क्रमांक एलएलपी आयएन : एबीझेड ८४२१ आणि नोंदणीकृत कार्यालय : पहिला मजला, ४२ ए, इम्प्रेशन हाउस,जी.डी आंबेकर मार्ग,वडाळा, महाराष्ट्र, मुंबई ४०००३१ येथे आहे, **("मालक")** यांच्या यातील परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या त्यांच्या जमिनीच्या **("जमीन")** मालकीच्या संबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

सदर जागेमध्ये आणि/किंवा त्यातील कोणत्याही भागामध्ये/तुकड्यामध्ये आणि/किंवा त्यासंबंधातील हक्क विलेखामध्ये आणि दस्तऐवजामध्ये आणि/किंवा चटई क्षेत्र निर्देशांक/चटई क्षेत्र गुणोत्तर यामध्ये आणि/किंवा सदर जमिनीच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील हस्तांतरणीय विकास अधिकार आणि संभाव्य विकास यांच्या संबंधातील विक्री, अभिहस्तांकन, हस्तांतरण, वाटप, अदलाबदल, अभिहस्तांतरण, गहाण, धारणाधिकार, आकार, न्यास,भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेदारी, पोट- भाडेदारी, प्रलंबित वाद,अनुज्ञप्ती, विभाजन, स्थायी धारक अधिकार, मालकी अधिकार, अज्ञान अधिकार, संरक्षित भाडेदारी, सर्व साधारण भाडेदारी, आदिवासी अधिकार, खाजगी वन अधिकार, संरचना मालक अधिकार, त्रयस्थ पक्षकारअधिकार, भोगवटा अधिकार, अधित्याग, अधित्यजन, प्रसंविदा, आरक्षण, संपादन किंवा अधिग्रहण, काळजीवाहू अधिकार, भार, वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार,कुटुंब व्यवस्था/ तडजोड, वाद आणि विवाद, मृत्युपत्र, मृत्युपत्रीत अधिकार लेख, मृत्युपत्रीत प्रमाण, प्रशासन पत्र, सुविधाधिकार, कब्जा, परिरक्षा, विकास अधिकार, उप- विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन, विकास व्यवस्थापन, संयुक्त साहस, सहयोग, भागिदारी किंवा कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश (अंतरिम किंवा अंतिम), कोणत्याही न्यायालयाचा किंवा अन्य प्राधिकरणाचा न्यायालयीन हुकूमनामा, कोणताही कराररनामा /करार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, पर्याय, लाभ दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी आणि/किंवा कोणत्याही व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना त्यांच्या ४०७, युसुफ बिल्डींग,४था मजला,वीर नरीमन मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१ येथील पत्त्यावर या जाहिरातीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत त्यास पाठींबा देणाऱ्या सर्व दस्तावेजी पुराव्याच्या नोटरी केलेल्या प्रमाणित सत्य प्रतींसह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा अशा प्रकारचा तथाकथित कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, लाभ, दावा, आक्षेप, शेअर किंवा मागणी, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल.

**वरील संदर्भित केलेले परिशिष्ट**
("जागेचे वर्णन")

मौजे दत्तपाडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र, पिन कोड ४०२ २०९ येथील गट क्रमांक ५३/२ च्या जमिनीचा तो सर्व तुकडा आणि भाग, क्षेत्रफळ सुमारे ४,३७० चौरस मीटर आणि खालील प्रमाणे सिमित असलेला :

उत्तर दिशेकडे : गट क्रमांक ४८ आणि गट क्रमांक ४९;
दक्षिण दिशेकडे : गट क्रमांक ५४ आणि गट क्रमांक ६३ आणि गट क्रमांक ६५;
पूर्व दिशेकडे : गट क्रमांक ५३/१ आणि गट क्रमांक ५३/३;
पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक ४८ आणि गट क्रमांक ६५.

मुंबई, आज दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५

**मेसर्स एम. टी. मिस्किटा अँड कंपनी**
वकील आणि सॉलिसिटर्स

## निवडक




### कास्पारोव्हचा आनंदवर विजय

**सेंट लुईस (अमेरिका) :** ३० वर्षांनंतरही इतिहासाची पुनरावृत्ती कायम राहिली. गॅरी कास्पारोव्हने क्लच चेस लेजेंड्स स्पर्धेतील दहाव्या खेळात विश्वनाथन आनंदचा पराभव करत दोन डाव बाकी असतानाच सामना जिंकला. बरोबर ३० वर्षांपूर्वी, १० ऑक्टोबर १९९५ रोजी, आनंदने न्यूयॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या १०७व्या मजल्यावर झालेल्या २०-खेळांच्या क्लासिकल वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये १८व्या खेळात बरोबरी पत्करली होती आणि त्यामुळे कास्पारोव्हने १०.५-७.५ अशा फरकाने अजिंक्यपद मिळवले होते. नियमांनुसार, ब्लिट्झ टाइम कंट्रोलअंतर्गत शेवटचे दोन खेळ खेळले गेले आणि आनंदने दोन्ही जिंकले. अखेरीस गुणफलक १३-११ असा राहिला. कास्पारोव्हने ७८,००० अमेरिकी डॉलर्स जिंकले, तर आनंदला ६६,००० डॉलर्स मिळाले. एकूण बक्षीस रकम १,४४,००० डॉलर्स होती. सामन्यात कास्पारोव्ह पाच गुणांनी आघाडीवर होता तरी अंतिम दिवशी १२ गुण मिळणार असल्याने आनंदलाही विजेतेपदाची संधी आहे, याची जाणीव कास्पारोव्हला होती.

### भारताला अव्वल स्थानी येण्याची संधी

**दिल्ली :** हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ सध्या महिला विश्वचषकाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र, भारतीय संघाला अव्वल क्रमांकावर झेप घेण्याची सुवर्णसंधी आहे. भारताने आतापर्यंत तीनपैकी दोन सामने जिंकले असून संघाच्या खात्यात ४ गुण आहेत. मागील सामन्यात भारताला दक्षिण आफ्रिकेकडून पराभव स्विकारावा लागला होता. रविवार, १२ ऑक्टोबर, भारताचा चौथा सामना बलाढ्य ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. जर भारतीय संघाने पुन्हा पहिल्या स्थानावर पोहोचायचे असेल, तर केवळ विजय नव्हे, तर मोठ्या फरकाने विजय आवश्यक आहे. भारताने रविवारी ऑस्ट्रेलियावर विजय मिळवला, तर त्याच्या खात्यातही ६ गुण होतील. पण इंग्लंडला मागे टाकण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलियावर मोठ्या नेट रन रेटने विजय मिळवावा लागेल. पण जर भारताचा पराभव झाला तर भविष्य अंधारात जाईल आणि सेमीफायनलचे समीकरण चुरशीचे होईल.

### नेमळेची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**बांदा :** बांदा येथे झालेल्या तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत नेमळे पंचक्रोशी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. त्यांच्या कामगिरीमुळे सहा विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्पर्धेत सोहम मडवळ याने १७ वर्षांखालील मुलांच्या गटात गोळाफेक (८.९७ मीटर) प्रकारात तालुक्यात प्रथम आला. सूरज नेमळेकर याने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात ४०० मीटर धावणेत द्वितीय, बाळकृष्ण वाडेकर याने ६०० मीटर धावणेमध्ये द्वितीय, प्राची राऊळ हिने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात गोळाफेक प्रकारात प्रथम, भालाफेक द्वितीय, ऋतुराज वराडकर याने भालाफेक प्रकारात प्रथम, गोळाफेक द्वितीय, अर्जुन ठुंबरे याने थाळीफेकमध्ये द्वितीय क्रमांक पटकावा. या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आ. भि. राऊळ, प्रा. कल्पना बोवलेकर आदींनी अभिनंदन केले. क्रीडा शिक्षक आर. के. राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

### पूजा-समृद्धी कराटे स्पर्धेत प्रथम

**रत्नागिरी :** रत्नागिरी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेमध्ये आबलोली ता. गुहागर येथील चंद्रकांत बाईत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी पूजा आंब्रे हिने १४ वर्षांखालील वयोगटात, तर समृद्धी भोजने हिने



१७ वर्षांखालील वयोगटात कराटे स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. पूजा आंब्रे व समृद्धी भोजने यांची जिल्हास्तरावर स्पर्धा झाली असून, लवकरच विभागस्तरावर स्पर्धा होईल. त्यानंतर त्या राज्यस्तरावर स्पर्धेसाठी पात्र होतील. या दोन्हीही विद्यार्थिनींचे प्राध्यापक डी. डी. गिरी, सचिन बाईत, स्नेहल बाईत यांच्यासह गुहागर तालुक्यातील विविध सामाजिक, धार्मिक संघटना यांच्यावतीने या विद्यार्थिनींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भारत एका डावाने विजायच्या उंबरठ्यावर

## वेस्ट इंडिजचा २४८ धावांवर खुर्दा, दुसऱ्या डावातही लोटांगण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने दुसऱ्या कसोटीत वेस्ट इंडिजला कुलदीप यादवच्या प्रभावी गोलंदाजीमुळे तिसऱ्या दिवशी फॉलोऑन दिला. पण नंतर जॉन कॅम्पबेल आणि शाय होप यांनी शतकी भागीदारी करत वेस्ट इंडिजच्या आशा उंचावल्या. तरी तिसऱ्या दिवस अखेर भारताकडे अद्यापही मोठी आघाडी आहे. भारत आणि वेस्ट इंडिज संघात दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात रविवारी तिसऱ्या दिवसाचा खेळ झाला. या सामन्यात भारताने कुलदीप यादवच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजला फॉलोऑन दिला. पण दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजने चांगली फलंदाजी केली. त्यांच्याकडून जॉन कॅम्पबेल आणि शाय होप यांनी अर्धशतके करताना चांगली झुंज दिली. पण तिसऱ्या दिवसाचा खेळ संपलातिसऱ्या दिवसाचा खेळ संपला. फॉलोऑन खेळणाऱ्या वेस्ट इंडिजने २ बाद १७३ धावा केल्या आहेत. संघ



अजूनही भारतापेक्षा ९७ धावांनी पिछाडीवर आहे. या कसोटीत किंवा या मालिकेत पहिल्यांदाच वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी ताकद दाखवली आहे. ३५ धावांत दोन विकेट गमावल्यानंतर, जॉन कॅम्पबेल आणि शाई होप यांनी आता तिसऱ्या विकेटसाठी २०७ चेंडूंत १३८ धावांची नाबाद भागीदारी केली आहे. कॅम्पबेल ८७ धावांवर आणि होप ६६ धावांवर खेळत आहेत. कॅम्पबेलचे अर्धशतकवेस्ट इंडिजचा सलामीवीर जॉन कॅम्पबेलने अर्धशतक झळकावले. या मालिकेत वेस्ट इंडिजकडून अर्धशतक नोंदवणारा तो पहिलाच खेळाडू ठरला आहे. सध्या वेस्ट इंडिजची धावसंख्या २ बाद ९० अशी आहे. कॅम्पबेलसोबत शाय होप खेळपट्टीवर उपस्थित आहे.

भारताने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करत ५ बाद ५१८ धावांवर आपला डाव घोषित केला होता. यानुसार, भारताकडे अजूनही २३५ धावांची मोठी आघाडी कायम आहे. भारतीय संघ डावाने विजय मिळवण्याचा प्रयत्न करेल.वेस्ट इंडिजला दुसरा धक्कावेस्ट इंडिजच्या संघाला ३५ धावांवर दुसरा मोठा धक्का बसला. फॉलोऑन खेळणाऱ्या विंडीज संघाचा डाव पहिल्या डावात २४८ धावांवर आटोपला होता. भारताचा संघ डावाने सामना जिंकण्यास उत्सुक आहे. तेजनारायण चंद्रपॉल (१०) आणि अलिक अथनाझे (७) धावा करून बाद झाले. वेस्ट इंडिजला पहिला धक्काफॉलोऑन खेळण्यासाठी उतरलेल्या वेस्ट इंडिज संघाला १७ धावांवर पहिला धक्का बसला. मोहम्मद सिराजने तेजनारायण चंद्रपॉलला शुभमन गिलकरवी झेलबाद केले. गिलने सूर मारून उत्कृष्ट झेल टिपला. त्यानंतर जॉन कॅम्पबेल आणि अलिक अथनाझे यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. वेस्ट इंडिजचा पहिला डाव २४८ धावांवर संपुष्टात आला. यापूर्वी, कॅम्पबेल १०, चंद्रपॉल ३४ आणि अलिक अथनाझे ४१ धावा करून बाद झाले होते. कर्णधार रोस्टन चेस याला खातेही उघडता आले नाही. भारताकडून गोलंदाजी करताना कुलदीप व्यतिरिक्त जडेजाने तीन बळी घेतले, तर बुमराह आणि सिराज यांना प्रत्येकी एक बळी मिळाला आहे.

## पुणेरी पलटनचा विजय



**। दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ७८ वा सामना पुणेरी पलटन आणि तमिळ थलायवाज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पुणेरी पलटनने ३६- २३ ने विजय मिळवला. त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पुणेरी पलटनकडून पंकज मोहितेने सर्वाधिक ९ गुणांची कमाई केली. तर अस्लम इनामदारने ७ गुणांची कमाई केली. तमिळ थलायवाजकडून अर्जुन देशवालला अवघे ६ गुणांची कमाई करता आली. या सामन्यात तमिळ थलायवाजकडून अर्जुन देशवाल पहिली चढाई करण्यासाठी आला. पहिल्याच चढाईत त्याने १ गुण घेत संघाचे खाते उघडले. तर पुणेरी पलटनकडून अस्लम इनामदार चढाईला आला आणि पहिल्याच चढाईत त्याने बोनस घेत संघाचे खाते उघडले.

तिसऱ्याच मिनिटाला अस्लम इनामदारने हनुमान उडी घेत २ गुणांची कमाई केली. ७ व्या मिनिटाला तमिळ थलायवाजचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह १०-१ गुणांसह ९ गुणांची आघाडी घेतली. तमिळ थलायवाजला सुरुवातीच्या १० मिनिटात अवघ्या ३ गुणांची कमाई करता आली. पुणेरी पलटनने १२- ३ गुणांसह ९ गुणांची आघाडी घेतली. सुरूवातीच्या १० मिनिटात पिछाडीवर राहिलेल्या तमिळ थलायवाजने पुढील १० मिनिटात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला . शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ७ गुणांची आघाडी होती. २० मिनिटांचा खेळ पूर्ण झाल्यानंतर पुणेरी पलटनने २०-११ गुणांसह आपली आघाडी कायम ठेवली. उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटात दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. पूर्वार्धातील सुरुवातीचा १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनकडे २५-१६ गुणांसह ९ गुणांची आघाडी होती. शेवटच्या मिनिटाला बंगाल वॉरियर्सला ऑलआऊट करत पुणेरी पलटनने हा सामना ३६-२३ सह आपल्या नावावर केला.

## कबड्डी स्पर्धेत सारळ शाळेच्या मुलींनी मारली बाजी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पालघर येथे झालेल्या आंतरशालेय विभागीय मुलींच्या कबड्डी स्पर्धेत आपल्या शाळेने १४ वयोगटांमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

या कबड्डी संघातील सहभागी विद्यार्थ्यांनी कर्णधार श्रुती कोळी, सहिश्री कोळी, अविष्का कोळी, मनस्वी ससकर, संभिक्षा नाखवा, नूरसमा खातून, रोशीना खातून, हितिशा कोळी, नेहा भगत, कनिष्का वर्तक, सायली कोळी, नेहा म्हात्रे या संघाला या संघाला मार्गदर्शन एच. टी. पाटील, एस. एस जाधव, जे. ए. पाटील यांनी केले.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, शाळा समितीचे चेअरमन आर्य पाटील हषिकेश नाईक, सुशिल पाटील, मुख्याध्यापिका भारती पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

## डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिर शाळेचे जिल्हास्तरीय स्पर्धेत यश

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

शासन मान्य महाराष्ट्र राज्य जिल्हास्तरीय सुब्रोतो फुटबॉल कप स्पर्धा, व्हॉलीबॉल, कुस्ती, बुद्धिबळ आणि कॅरम या विविध क्रीडा प्रकारांमध्ये डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिर, खोपोलीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत एकाच वेळी अनेक विजेतेपदे पटकावली आहेत.



सुब्रोतो कप फुटबॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींचा संघ आणि १५ वर्षाखालील मुलांचा संघ विजयी झाला. जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींनी प्रथम तर १४ वर्षाखालील मुलींनी द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात वेद दिनेश मरागजे यांन रौप्यपदक प्राप्त केले. जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत १४ आणि १७ वर्षाखालील मुले तृतीय पारितोषिक विजेते ठरली.

बुद्धिबळ स्पर्धेत विनंती वाघ, आर्था देशमुख, तीर्था देशमुख, शर्वरी देशमुख, अविष्कार शेजवळ, अलिशा शेख, मनस्वी देशमुख आणि श्रेया मिंडे यांनी उत्तुंग कामगिरी करत आपल्या बुद्धिमत्तेची छाप उमटवली. कॅरम स्पर्धेत हर्षदा ओमले, आर्था देशमुख, तीर्था देशमुख, श्रेया पाटील, स्नेहा ढोकले, धनश्री जाधव, स्वरा कोळंबे, श्लोक देशमुख, श्रवण जाधव, अथर्व पांडव, आदित्य गुरव यांनी विजेतेपद पटकावले. या उल्लेखनीय यशाबद्दल खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, सचिव किशोर पाटील आणि विजय चुरी यांनी सर्व विजयी खेळाडूंचे तसेच क्रीडा मार्गदर्शक अमित विचारे रोहन मोरे आणि स्वप्नाली देशमुख यांचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी पुढील वाटचालीसाठी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## रन फॉर युनिटी स्पर्धेत ऋतुजा प्रथम




**पाली/गोमाशी, प्रतिनिधी**

जनजागृती प्रतिष्ठान हिरानंदानी पवई यांच्या वतीने सरदार पटेल रन फॉर युनिटी या ५ किलोमीटर धावण्याच्या स्पर्धाचे आयोजन रविवार दि. १२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत १७ ते ३० वयोगटातील १९७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.या स्पर्धेत ऋतुजा पाराजूतेरे हिने हे अंतर २२ मिनिटे १० सेकंदात पूर्ण करून स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## इंग्लंडची विजयाची हॅट्ट्रिक

**। दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिला विश्वचषक २०२५ मधील १२ व्या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेचा ८९ धावांनी पराभव करून विजयरथाची हॅट्रिक साधली. इंग्लंडच्या या धमाकेदार विजयानंतर गुणतालिकेत मोठी उलथापालथ दिसत आहे, कारण थेट पहिल्या स्थानावरील संघाला धक्का बसला आहे. इंग्लंडने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेसमोर २५४ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र श्रीलंकेची संपूर्ण संघ ४५.४ षटकांत १६४ धावांवर गारद झाली.

## हिटमॅनचा शिवाजी पार्कवर जलवा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लवकरच ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका आणि ५ सामन्यांची टी-२० मालिका सुरू होणार आहे. या एकदिवसीय मालिकेसाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची निवड झाली असून, रोहित शर्माने दौऱ्यापूर्वी जोरदार सराव सुरू केला आहे. रोहित मुंबईतील शिवाजी पार्क येथे सराव करताना दिसला. हिटमॅनने नेटमध्ये भरपूर घाम गाळला आणि बचावात्मक शॉट्ससह अनेक चौकार आणि षटकार मारून आक्रमक फलंदाजीचा सराव केला. रोहित जवळजवळ सात महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. यापूर्वी त्याने



२०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताचे नेतृत्व केले होते आणि संघाने विजेतेपदही पटकावले होते. मोठ्या काळानंतर पुनरागमन करताना रोहित भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात कर्णधार म्हणून नव्हे, तर केवळ खेळाडू म्हणून सहभागी होणार आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताला विजय मिळवून दिल्यानंतरही रोहितकडून कर्णधारपद काढून घेण्यात आले. रोहित आता गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाकडून एक वरिष्ठ खेळाडू म्हणून मैदानात उतरणार आहे.

## रायगड बेंचप्रेस पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत शंभरहून अधिक लिफ्टरांचा सहभाग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

व्ही. के. हायस्कूल, पनवेल येथे स्व. कुमार दिपक सुरेखा अरुण पाटकर यांच्या स्मरणार्थ आयोजित रायगड बेंचप्रेस पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या खेळाडूंनी ताकद, तंत्र आणि तडफ दाखवत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या स्पर्धेत गायत्री बडेकर, प्रणाली माने, अमृता भगत, आशा घरत, जाहिद काणेकर, तन्मय पाटील, गणेश तोटे आणि दिनेश पवार यांनी 'सर्वोत्तम लिफ्टर'चा मान मिळवला.

स्पर्धेचे सांघिक विजेतेपद कर्जतच्या आय. एन. डी क्लबने पटकावून आपले वर्चस्व सिद्ध केले.

समस्त पाटकर कुटुंबीयांनी पुरस्कृत या स्पर्धेत महाड, खोपोली, पेण, पनवेल आणि कर्जत येथील शंभराहून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन संतोष आमले यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. कुमार शिंदे, संजय सरदेसाई, सूर्यकांत गद्रे, दत्ता पाटकर, रामदास झोपे, गिरीश वेदक, सुभाष टेंबे, माधव पंडित, संदीप पाटकर आणि सचिन भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

विजेत्यांना समाधान पाटील, माधव पंडित, दत्ता पाटकर, सुभाष टेंबे आणि राहुल गजरमल यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

### सर्वोत्तम लिफ्टर विजेते

**पुरुष विभाग:** सब ज्युनिअर जाहिद काणेकर,ज्युनिअर तन्मय पाटील, सीनियर गणेश तोटे, मास्टर्स दिनेश पवार विजयी ठरले.

**महिला विभाग:** सब ज्युनिअर गायत्री बडेकर, ज्युनिअर प्रणाली माने, सीनियर अमृता भगत मास्टर्स आशा घरत, सांघिक विजेतेपद:आय एन डी क्लब कर्जत, द क्राडझिला फिटनेस महाड, फिटनेस ऑन जिम पनवेल विजयी ठरले आहेत.

## हलाखीच्या परिस्थितीवर मात करत मिळवले यश | ऑलिंपिकमध्ये खेळण्याची इच्छा

# बॉक्सिंगमध्ये श्रुतीने पटकावले पदक

**। नांदेड । प्रतिनिधी ।**

नांदेडच्या श्रुतींनही असंच काहीसं स्वप्न बघितलं होतं. तिला मोठं झाल्यावर डॉक्टर बनायचे होते. तशी तयारीही तिने सुरू केली होती. मात्र, तिच्या वडिलांची वेगळीच स्वप्न होती. तिने बॉक्सिंग क्षेत्रात करियर करावे, असे तिच्या वडिलांचे स्वप्न होते. श्रुतीने बॉक्सर व्हावं, असे तिच्या वडिलांचे स्वप्न होतं. वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी श्रुतीनं बॉक्सिंगचा खडतर प्रवास स्वीकारला. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी श्रुतीने बॉक्सिंगच्या रिंगमध्ये पाय ठेवत बॉक्सिंगचे धडे गिरवायला सुरूवात केली. मोठे झाल्यावर डॉक्टर, इंजिनिअर, फार्मासारख्या क्षेत्रात करियर करण्याची अनेकांची इच्छा असते. अनेक पालकांचीही तशीच इच्छा, स्वप्न असतात. इतर क्षेत्राकडं वळण्याचा कल मात्र खूप कमी असल्याचे दिसून येते.तिच्या वडिलांचे निधन झाले. या धक्क्यातून सावरुन तिने आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिद्द आणि चिकाटीने मेहनत करण्यास सुरुवात केली. आज त्यात ती यशस्वी झाली.

बॉक्सिंगच्या खडतर प्रवासात श्रुतीने आतापर्यंत जिल्हास्तरापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची कमाई केली आहे. दिल्लीमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. मेंडकेकर कुटुंबीय नांदेड शहरातील खडकपुरा परिसरात राहतात. श्रुतीचे दिवंगत वडील रत्नाकर मेंडकेकर



हे ट्रॅक्टरच्या एका खासगी गॅरजमध्ये काम करत होते. त्यांना दोन मुली आहेत, एक श्रुती आणि दुसरी श्रीशा. लहानपणापासूनच डॉक्टर होण्याचं स्वप्न श्रुतीने बघितलं होतं. तशी इच्छाही तिने आपल्या वडिलांना बोलून दाखवली होती.

आपली मुलगी सक्षम झाली पाहिजे, स्वत:च्या पायावर उभारली पाहिजे. तसेच स्वत:चे रक्षण करत आपल्या बहिणीचे रक्षण केले पाहिजे, अशी वडिलांची इच्छा होती. या उद्देशाने श्रुतीच्या वडीलांनी शहरातील मब्लेंज कॉम्बॅक्ट फिटनेस सेंटरमध्ये वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी बॉक्सिंग शिकवण्यासाठी पाठवले. फिटनेस सेंटरचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक किरण गवळी व दीपा गवळी यांनी श्रुतीला बॉक्सिंगमधला कॉम्बॅक्ट किक बॉक्सिंग हा प्रकार शिकवला. श्रुतीनेही संघर्ष करत बॉक्सिंगची कला आत्मसात केली. तिने जिल्हास्तरीय स्पर्धांपासून ते आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आपली बॉक्सिंगमधले कौशल्य सर्वांना दाखवले आहे.

### ऑलिंपिकमध्ये पदकाची आशा

श्रुतीने आपल्या कौशल्याच्या जोरावर आतापर्यंत जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची लयलूट केली आहे. दिल्लीमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत श्रुतीने दमदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. भविष्यात ऑलिंपिकमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करण्याची इच्छा असून, देशासाठी पदक जिंकण्याची इच्छा आहे.

## टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याची पृथा विजयी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

नांदेड येथे नांदेड जिल्हा टेबल टेनिस संघटना आयोजित दिया चितळे गौरव करंडक पाचव्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत महिला गटात पुण्याच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू पृथा वर्टीकरने विजेतेपदाचा मान मिळविला. महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने नांदेड येथील सदाशिवराव पाटील क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत महिलांच्या अंतिम लढतीत पाचवे मानांकन असलेल्या पृथा वर्टीकरने मुंबई महानगर जिल्हा संघाच्या सहाव्या मानांकित श्वेता पार्टे-नायकचा रंगतदार सामन्यात पराभव केला. या लढतीत पृथाने काउंटर टॅक पद्धतीचा खेळ केला. पृथाने पहिल्या तीन गेम जिंकून ३-० अशी आघाडी मिळवली. चौथी गेम श्वेता पार्टेने जिंकली, तर पृथाने पाचवी गेम सहज जिंकून जेतेपद मिळविले. यंदाच्या मोसमातील पृथा वर्टीकरचे हे पहिलेच विजेतेपद आहे. त्याआधी उपांत्य फेरीत पृथा वर्टीकरने ठाण्याच्या नवव्या मानांकित सुक्रती शर्माचा, तर मुंबई महानगर जिल्हा संघाच्या सहाव्या मानांकित श्वेता पार्टे-नायकने टीएसटी संघाच्या सातव्या मानांकित मुक्ता दळवीचा चुरशीच्या सामन्यात पराभव केला होता, तर उपांत्यपूर्वफेरीत अनुष्का पाटीलवर ९-११, १३-११, ११-३, ११-३ असा विजय मिळविला होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)